रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १८८
www.ramprahar.com

◆ शनिवार, २४ जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

अलिबाग पालिका समित्यांवर विरोधकांना डावलले/२
'आंग्रु डुंग्रू'तून उजळला आगरी बोलीभाषेचा गोडवा/६
रणजी ट्रॉफी स्पर्धेत सर्फराज खानचे द्विशतक/८

## स्व. बाळासाहेब ठाकरेंच्या जयंतीनिमित्त एसटीची योजना



**मुंबई** : स्व. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या १००व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे-एसटी संगे तीर्थाटन' योजना साकारली आहे. याबाबत परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी घोषणा केली. या योजनेंतर्गत प्रत्येक आगार कार्यक्षेत्रातून ४० प्रवाशांचा गट तयार करून त्यांच्या सामाजिक सवलतीच्या तिकीट दरात सहली आयोजित केल्या जाणार आहेत. या सहलींसाठी एसटीच्या नव्या, सुरक्षित व आरामदायी बसेस उपलब्ध करून देण्यात येणार असून प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर होणार आहे. २३ जानेवारीपासून ही योजना राज्यातील २५१ आगारांत एकाच वेळी राबविण्यात येणार आहे. त्यामुळे धार्मिक पर्यटनाला नवे बळ मिळेल. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

# पनवेलमध्ये भाजप पदाधिकाऱ्यांची बैठक

## प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले मार्गदर्शन




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषद आणि पनवेल, उरण, कर्जत, खालापूर पंचायत समिती निवडणुकीसंदर्भात भाजपच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक शुक्रवारी (दि. २३) प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत पनवेल येथे झाली. या बैठकीत निवडणुकीच्या अनुषंगाने संघटनात्मक तयारी, नियोजन, रणनीती व आगामी कार्यदिशा यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

विरूपाक्ष मंगल कार्यालयात झालेल्या या बैठकीला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, रवी भोईर, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि उमेदवार उपस्थित होते. रायगडच्या विकासासाठी आणि जनतेच्या हितासाठी भाजप संघटन अधिक मजबूत करून विजयाकरिता ठाम निर्धाराने काम करण्याचा संकल्प या बैठकीत करण्यात आला.

# नवी मुंबई महापालिका भाजप गटनेतेपदी सागर नाईक यांची निवड

## ६६ नगरसेवकांची कोकण भवन येथे नोंदणी



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या महापौरपदी कोणाची नियुक्ती होणार याची उत्सुकता असतानाच भारतीय जनता पक्षाने गटनेत्यासह ६६ नगरसेवकांची कोकण भवन येथे शुक्रवारी (दि. २३) नोंदणी केली.

या वेळी माजी खासदार डॉ. संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक, नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, माजी महापौर सागर नाईक, अभिजीत पेडणेकर आदी उपस्थित होते.

मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीचा निकाल गेल्या शनिवारी जाहीर झाला. वनमंत्री गणेश नाईक यांच्या नेतृत्वात नवी मुंबई महापालिकेत ६५ नगरसेवकांसह भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. सत्तास्थापनेसाठी भाजपकडे पूर्ण बहुमत आहे.

नवी मुंबई महापालिकेत भाजप पक्षाचा गटनेता म्हणून माजी महापौर सागर नाईक यांची सर्वसंमतीने निवड करण्यात आली असून कोकण भवन येथे ६६ नवनिर्वाचित नगरसेवकांनी अधिकृत गट नोंदणी केली. १४ ड मधून निवडून आलेले भरत भोईर या अपक्ष नगरसेवकानेदेखील भाजपला बिनशर्थ पाठिंबा दिल्याने भाजपचे नवी मुंबई महापालिकेतील संख्याबळ ६६वर गेले आहे.

या वेळी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना डॉ. संजीव नाईक म्हणाले की, सर्वसंमतीने सागर नाईक यांची गटनेतेपदी निवड करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि वरिष्ठ नेत्यांच्या स्तरावर महापौर कोण होणार याचा निर्णय होईल. भाजपचे नगरसेवक निवडणुकीत जनतेला दिलेल्या आश्वासनांची येत्या पाच वर्षात पूर्तता करतील आणि नवी मुंबई शहराच्या विकासाला पुढे नेतील.

गटनेतेपदी निवडीवर प्रतिक्रिया देताना सागर नाईक यांनी सहकारी नगरसेवकांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल धन्यवाद दिले तसेच महापालिकेच्या माध्यमातून नवी मुंबई शहराचा विकास आणखी उंचीवर नेऊ, असे सांगितले. महापौरपदाचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, वनमंत्री नामदार गणेश नाईक व वरिष्ठ नेत्यांच्या स्तरावर होईल, असेही ते म्हणाले.

नवी मुंबई महापालिकेवर पहिल्यांदाच कमळ फुलले आहे. त्यामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.


# राजिप, पं.स. निवडणुकीत २९ अर्ज अवैध

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद आणि १५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांपैकी २९ अर्ज छाननीत अवैध ठरले. त्यात जिल्हा परिषदेच्या दोन, तर पंचायत समित्यांच्या निवडणुकीतील २२ अर्जांचा समावेश आहे.

जिल्हा परिषदेचे ३६१ आणि पंचायत समित्यांचे ६५६ उमेदवारी अर्ज वैध ठरले आहेत. पुरुषांपेक्षा महिला उमेदवारांचे अर्ज जास्त आहेत. २७ जानेवारी हा उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे. त्यानंतरच निवडणुकीचे चित्र स्पष्ट होईल.

निवडणूक उमेदवारी अर्ज दाखल करण्यास १६ जानेवारीपासून सुरुवात



झाली. २१ जानेवारीपर्यंत अर्ज दाखल करण्यात आले. २२ जानेवारीला अर्जांची छाननी करण्यात आली. जिल्हा परिषद निवडणुकीसाठी ३९१ अर्ज दाखल झाले होते. त्यापैकी सात अर्ज छाननीत अवैध ठरले. त्यामुळे ३६१ उमेदवारांचे अर्ज वैध घोषित करण्यात आले आहेत. वैध उमेदवारांमध्ये १७४ पुरुष व १८७ महिला उमेदवारांचा समावेश आहे.

२५ पंचायत समित्यांसाठी ६७८ अर्ज दाखल झाले होते त्यातील २२ अर्ज छाननीत बाद झाले. त्यामुळे ६५६ उमेदवारांचे अर्ज वैध घोषित करण्यात आले आहेत. वैध उमेदवारांमध्ये ३२७ पुरुष व ३२९ महिला उमेदवारांचा समावेश आहे.

अलिबाग तालुक्यात सर्वाधिक ९६ अर्ज दाखल झाले होते. त्यातील दोन अवैध, तर ९४ वैध ठरले. पनवेलमध्ये ८३पैकी ८१ अर्ज वैध ठरले. कर्जतमध्ये ८०पैकी ६८ अर्ज वैध, खालापूरमध्ये ४०पैकी ३४ अर्ज वैध, पेणमध्ये ६२पैकी ५८ अर्ज वैध, उरणमध्ये ४६पैकी ४४ अर्ज वैध ठरले. मुरूड व माणगावमध्ये दाखल झालेले सर्व अर्ज वैध ठरले आहेत.

# महाराष्ट्र सदन प्रकरणात मंत्री भुजबळ दोषमुक्त



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांची ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयाकडून महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणात निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. याआधी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून (एसीबी) भुजबळ यांना दिलासा मिळाला होता.

भुजबळ हे सार्वजनिक बांधकाममंत्री असताना दिल्लीतील महाराष्ट्र सदन बांधकामामध्ये अफरातफर केल्याचा आरोप होता. या प्रकरणात ते दोन वर्ष जेलमध्येदेखील होते. यात छगन भुजबळ, मुलगा पंकज भुजबळ, पुतण्या समीर भुजबळ यांच्यासह एकूण १४ जणांची नावे होती. भुजबळ व इतरांची एसीबीकडून निर्दोष मुक्तता करण्यात आल्यानंतर त्यांनी ईडकडेही असाच अर्ज केला होता, जो मंजूर केला गेला. त्यामुळे त्यांची या प्रकरणातून निर्दोष मुक्तता झाली आहे.

## निवडक

### झारखंडमध्ये मोठी कारवाई; २१ नक्षलवाद्यांचा खात्मा



**रांची** : झारखंडच्या पश्चिम सिंहभूम जिल्ह्यातील सारंडा जंगलात सीआरपीएफ आणि झारखंड पोलिसांनी केलेल्या संयुक्त कारवाईत आतापर्यंत २१ नक्षलवादी ठार झाले आहेत. गुरुवारी १५ जणांच्या मृत्यूची पुष्टी झाल्यानंतर शुक्रवारी (दि. २३) आणखी सहा मृतदेह सापडले. २.३५ कोटी रुपयांचे बक्षीस असलेला भयानक नक्षलवादी अनल दा हाही यात मारला गेला आहे. चकमकीनंतर पोलिसांनी मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि स्फोटके जप्त केली आहेत.

### बर्फवृष्टीमुळे वैष्णोदेवी यात्रा स्थगित, शाळांनाही सुट्टी

**श्रीनगर** : जम्मू आणि काश्मीरमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पाऊस आणि जोरदार हिमवृष्टीमुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. त्रिकुटा टेकड्यांवर झालेल्या हिमवृष्टीमुळे सुरक्षेच्या कारणास्तव माता वैष्णोदेवीची यात्रा स्थगित करण्यात आली असून वाहतूक व्यवस्थाही कोलमडली आहे. खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाने अनेक जिल्ह्यांतील शाळा बंद ठेवण्याचे आदेश दिले.

# गोगावले, जगताप पोलिसांसमोर हजर



**महाड : प्रतिनिधी**

महाड नगर परिषद निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेदरम्यान झालेल्या शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस गटांतील हिंसाचारप्रकरणी महिनाभर सुरू असलेल्या नाट्यावर अखेर पडदा पडला आहे. उच्च न्यायालयाच्या स्पष्ट आदेशानंतर शुक्रवारी (दि. २३) दोन्ही पक्षांचे प्रमुख आरोपी पोलिसांसमोर शरण आले. न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

या प्रकरणात शिवसेनेचे नेते व मंत्री भरत गोगावले यांचे पुत्र विकास गोगावले आणि शिवसेना गटातील त्यांचे सहकारी सकाळी महाड शहर पोलीस ठाण्यात हजर झाले. त्यानंतर काही तासांतच राष्ट्रवादी काँग्रेसचे हनुमंत मोतीराम जगताप यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनीही पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले.

निवडणुकीदरम्यान शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या दोन गटांमध्ये झालेल्या हाणामारीनंतर परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले होते. या प्रकरणातील सर्व आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज उच्च न्यायालयाने फेटाळले. दोन्ही बाजूंकडील आरोपी पोलिसांसमोर हजर होणार असल्याची माहिती मिळताच महाड शहर पोलीस ठाण्याच्या परिसरात कडेकोट

शिवसेना गटाकडून विकास गोगावले, महेश गोगावले, विजय मालुसरे, प्रशांत शेलार, धनंजय मालुसरे, वैभव मालुसरे, सुरज मालुसरे आणि सिद्धेश शेठ, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या १२ आरोपींपैकी हनुमंत मोतीराम जगताप, श्रीयश माणिक जगताप, धनंजय (बंटी) देशमुख, जगदीश पवार आणि निलेश महाडिक हे पाच जण हजर झाले.

या सर्व आरोपींना महाड न्यायालयात हजर करण्यात आले असता त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. आता पोलीस प्रशासनाची पुढील भूमिका काय राहते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त रंगकर्मींचा सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील रंगरचना कला मंच नाट्य संस्थेच्या वतीने आयोजित एकपात्री नाट्य स्पर्धेला प्रतिसाद लाभला. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पनवेलमधील विविध रंगकर्मींचा या वेळी सन्मान करण्यात आला. हा उपक्रम गुरुवारी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकनेते रामशेठ ठाकूर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध मुलाखतकार व निवेदक संजय भुस्कुटे, अभिनेते मकरंद पाध्ये, नाट्य लेखक-दिग्दर्शक व अभिनेता निनाद शेट्टी, लेखक व अभिनेते रवी वाडकर, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, योगार्थी कॉलेज ऑफ इंडिक, ठाणेच्या प्राचार्य डॉ. सुषमा काळे, शेल शिक्षण संस्थेचे संस्थापक सुरेश काळे, अभिषेक पटवर्धन आदी उपस्थित होते.



एकपात्री नाट्य स्पर्धा बाल गट आणि खुला गट अशा दोन गटात घेण्यात आली. मुंबई, ठाणे, अलिबाग, रोहा, रसायनी, डोंबिवली, भायखळा आदी ठिकाणांहून स्पर्धकांनी सहभाग घेतला. दोन्ही गटांतील प्रयोगांना प्रेक्षकांकडून दाद मिळाली.

बाल गटातून आराध्य पाटील याने प्रथम क्रमांक (रोख ३००० रुपये, ट्रॉफी व प्रमाणपत्र) पटकावला. वज्रेश्वरी बंदने द्वितीय क्रमांक (रोख २००० रुपये, ट्रॉफी व प्रमाणपत्र), स्मद कोठेकर यांनी तृतीय क्रमांक (रोख १००० रुपये, ट्रॉफी व प्रमाणपत्र) मिळवला. उत्तेजनार्थ पारितोषिक प्रदीर्घ पाडवे, स्वरांगी जोशी आणि अनया पिंगळे यांना देण्यात आले.

खुल्या गटातून स्नेहल म्हात्रे यांनी प्रथम क्रमांक (रोख ३००० रुपये, ट्रॉफी व प्रमाणपत्र), निकिता घाग द्वितीय क्रमांक (रोख २००० रुपये, ट्रॉफी व प्रमाणपत्र) आणि मनाली इंगळे यांनी तृतीय क्रमांक (रोख १००० रुपये, ट्रॉफी व प्रमाणपत्र) प्राप्त केला. उत्तेजनार्थ पारितोषिक विल्सन खराडे, जीत जाधव आणि आदेश पवार यांनी मिळवले.

या वेळी अध्यक्षीय भाषणात लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, या स्पर्धेच्या आयोजनाबद्दल कौतुक केले. आज या स्पर्धकांनी सादर केलेली कला अत्यंत निखळ आणि दर्जेदार होती. तुम्ही केलेले सादरीकरण उत्कृष्ट आहे. पुढील काळात तुम्हाला जी काही मदत लागेल, ती करण्यासाठी मी नक्की प्रयत्न करेन.

उपक्रम यशस्वी करण्यासाठी पत्रकार व कलाकार विजय पवार आणि रंगरचना कला मंचच्या पदाधिकारी, सदस्यांनी परिश्रम घेतले.

# ७, ८ फेब्रुवारीला उरण महोत्सव रंगणार



**उरण : वार्ताहर**

महेश बालदी मित्र मंडळ आणि अस्तित्व महिला सक्षमीकरण संस्था उरण यांच्या संयुक्त विद्यमाने उरण महोत्सव २०२६चे आयोजन ७ व ८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ ते १० वाजेपर्यंत एनआय हायस्कूल मैदानावर करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या

### नियोजनासाठी बैठक

नियोजनासाठी शुक्रवारी (दि.२३) बैठक घेण्यात आली.

उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली दोन दिवस होणाऱ्या या महोत्सवात विविध गेम्स आणि मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर होतील. त्याचप्रमाणे खाद्यपदार्थ, कपडे, हस्तकला, गृहोपयोगी वस्तू असे ५०पेक्षा अधिक विविध स्टॉल असतील. याद्वारे उरणमधील उद्योजकांना प्रोत्साहन व पाठबळ देण्यात येणार आहे.

महोत्सवाच्या नियोजन बैठकीला नीता बालदी, भाजप महिला मोर्चा उरण तालुकाध्यक्ष राणी म्हात्रे, शहराध्यक्ष संपूर्णा थळी, माजी नगरसेविका जान्हवी पंडित, संगीता गायकवाड, सीमा घरत, ललिता म्हात्रे, सुप्रिया म्हात्रे, शमिता ठाकूर, अस्तित्व संस्थेच्या सदस्य सानिका कदम, पूनम पाटेकर, हेमा घरत आदी उपस्थित होत्या. आयोजन समितीमध्ये नगरसेविका रजनी कोळी यांचाही समावेश आहे.

## चिमुकलीवर अत्याचार करणारा नराधम कोठडीत

**बदलापूर : प्रतिनिधी**

बदलापूरमध्ये पुन्हा एका शाळेतील चार वर्षांच्या बालिकेवर अत्याचाराची घटना गुरुवारी उघडकीस आली होती. शाळेत ने-आण करणाऱ्या व्हॅनचालकाने बालिकेवर अत्याचार केला. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून न्यायालयाने त्याला २७ जानेवारीपर्यंत म्हणजेच तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

पीडित बालिका स्कूल व्हॅनमधून दररोज शाळेत ये-जा करायची. व्हॅनच्या चालकाने तिच्यावर अतिप्रसंग केला. मुलगी घरी आल्यानंतर तिने घडलेला प्रकार पालकांना सांगितला. ते ऐकून पालकांना धक्काच बसला. त्यांनी तत्काळ बदलापूर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली होती.

# माथेरानच्या उपनगराध्यक्षपदी भाजपचे संतोष शेलार

## मनोज खेडकर, प्रवीण सपकाळ यांची स्वीकृत नगरसेवकपदी निवड

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान नगर परिषदेच्या उपनगराध्यक्षपदी भारतीय जनता पक्षाचे महायुतीतील नगरसेवक संतोष शेलार यांची निवड करण्यात आली. त्याचबरोबर स्वीकृत नगरसेवकपदी शिवसेना शिंदे गटाचे अनुभवी नेते मनोज खेडकर आणि भाजपकडून शहराध्यक्ष प्रवीण सकपाळ यांना संधी देण्यात आली आहे.

पीठासीन अधिकारी तथा नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली उपनगराध्यक्ष आणि स्वीकृत नगरसेवकांच्या निवडीसाठी येथील हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे सभागृहात सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत





उपनगराध्यक्षपदी भाजपचे संतोष शेलार यांची, तर स्वीकृत नगरसेवकपदी शिवसेनेचे मनोज खेडकर व भाजपचे प्रवीण सकपाळ यांची निवड झाली.

नुकत्याच झालेल्या माथेरान नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत शिवसेना शिंदे गट आणि भारतीय जनता पक्ष महायुतीचे एकूण १५ नगरसेवक निवडून आले आहेत. स्वीकृत नगरसेवकपदासाठी खेडकर आणि सकपाळ यांचे दोन अर्ज आले होते. या अर्जांची छाननी प्रांत अधिकाऱ्यांनी करून ते वैध असल्याचे सांगितले. यानंतर नगराध्यक्ष चौधरी यांनी त्यांच्या नावांची घोषणा सभागृहात केली.

# हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे-एसटीसंगे तीर्थाटन योजनेचा शुभारंभ

**मुंबई : प्रतिनिधी**

सर्वसामान्य माणसाच्या जीवनाशी नाळ जोडून, त्याच्या श्रद्धेला सुरक्षिततेची आणि परवडणाऱ्या खर्चाची जोड देणारी एक लोकाभिमुख योजना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने साकारली आहे.

स्वर्गीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त सुरू करण्यात येणारी 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे – एसटी संगे तीर्थाटन' योजना म्हणजे श्रद्धा, सुविधा आणि सामाजिक न्याय यांचा सुरेख संगम आहे. असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले असून ही योजना 'स्वस्त आणि सुरक्षित' या ब्रीदवाक्यावर आधारित असून, सर्वसामान्य प्रवाशांना परवडेल अशा दरात धार्मिक पर्यटनाची अनुभूती देण्याचा तिचा मुख्य उद्देश आहे. असे ते म्हणाले.



राज्य शासनाने एसटी प्रवासासाठी विविध सामाजिक घटकांना दिलेल्या सर्व सवलती या योजनेत जशाच्या तशा लागू राहणार आहेत. महिलांना व ज्येष्ठ नागरिकांना मूळ तिकिटावर ५० टक्के सवलत, तर ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना विनामूल्य प्रवास देण्यात येणार आहे. योजनेअंतर्गत प्रत्येक आगार कार्यक्षेत्रातून ४० प्रवाशांचा गट तयार करून, त्यांच्या सामाजिक सवलतीच्या तिकीट दरात सहली आयोजित केल्या जाणार आहेत. या सहलींसाठी एसटीच्या नव्या, सुरक्षित आणि आरामदायी बसेस उपलब्ध करून देण्यात येणार असून, प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर होणार आहे. २३ जानेवारी २०२६ पासून ही योजना राज्यातील २५१ आगारांत एकाच वेळी राबविण्यात येणार आहे. प्रवाशांच्या मागणीनुसार प्रत्येक आगारातून किमान ५ बसेस या योजनेसाठी उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याने, राज्यभरात एका दिवशी सुमारे १,००० ते १,२५० धार्मिक व पर्यटन विशेष बसगाड्या धावणार आहेत. त्यामुळे धार्मिक पर्यटनाला एक नवे बळ मिळणार आहे. प्रवाशांच्या मागणीनुसार अष्टविनायक दर्शन, ११ मारुती दर्शन, पंढरपूर–अक्कलकोट, तुळजापूर, कोल्हापूर–पन्हाळा–जोतिबा, गणपतीपुळे, शेगाव, शिर्डी अशा विविध श्रद्धास्थळांच्या सहली आयोजित केल्या जाणार आहेत. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व अध्यात्मिक वैभवाचा अनुभव घेण्याची ही एक सुवर्णसंधी ठरणार आहे. 'स्वस्त आणि सुरक्षित पर्यटन' ही केवळ संकल्पना न राहता प्रत्यक्षात उतरवणारी ही योजना म्हणजे बाळासाहेब ठाकरे यांच्या सर्वसामान्यांवरील प्रेमाची आणि विचारांचीच पुढची पायरी आहे. त्यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त सुरू होत असलेली 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे – एसटी संगे तीर्थाटन' योजना राज्यातील लाखो भाविकांसाठी श्रद्धेचा, सुरक्षिततेचा आणि समाधानाचा प्रवास ठरणार आहे. अशा शुभेच्छा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिल्या आहेत.

# सुधागडात बिबट्याबाबत वनविभाग ॲक्शन मोडमध्ये

## गस्त वाढवली

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील पाच्छापूर परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्या आणि त्याच्या पिल्लांच्या दर्शनामुळे पसरलेली दहशत पाहता, वनविभागाने आता ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी विशाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरात रात्रीची गस्त वाढवण्यात आली असून, नागरिकांच्या सुरक्षेसाठी विविध ठिकाणी जनजागृतीचे फलक लावण्यात येत आहेत. याबरोबर समाज माध्यमांवर व व्हाट्सअप ग्रुपवर शेअर केले जात आहेत.




पाच्छापूरसह आजूबाजूच्या आसानवाडी, पोटलज आणि धोंडसे या गावांमध्ये बिबट्याचा वावर असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण होते. याची दखल घेत वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेटी देऊन पगमार्क्सची पाहणी केली आहे तसेच बिबट्याशी आमनासामना झाल्यास काय करावे, याबद्दल ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. गावातील मुख्य चौक आणि वर्दळीच्या ठिकाणी माहितीपर फलक लावून खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येणार आहे.

**पाच्छापूर परिसरात बिबट्याचा वावर लक्षात घेता आम्ही रात्रीची गस्त वाढवली आहे. लोकांमध्ये जनजागृती करत आहोत. नागरिकांनी अधिक सतर्क राहणे गरजेचे आहे. वनविभागाचे कर्मचारी परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. –विशाल सोनवणे, वनपरिक्षेत्र अधिकारी,**

# श्रीवर्धन नगरपरिषदेत विषय समित्यांचे सभापती व सदस्य नियुक्त

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन नगरपरिषदेमध्ये आज सकाळी ११ वाजता महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम व संबंधित नियमांनुसार नगरपरिषदेच्या विविध विषय समित्यांचे सभापती व सदस्यांची अधिकृत नियुक्ती करण्यात आली.

या बैठकीस पीठासीन अधिकारी तथा प्रभारी मुख्याधिकारी श्री. विठ्ठल राठोड, प्रशासकीय अधिकारी श्री. राऊल घुगे, नगराध्यक्ष श्री. अतुल चौगुले, तसेच सर्व नगरसेवक व नगरसेविका उपस्थित होते.

विषय समित्या – सार्वजनिक बांधकाम, नियोजन व पर्यटन विकास समिती सभापती : . साठविलकर समीर इस्माईल

शिक्षण, क्रीडा व युवा कल्याण व सांस्कृतिक कार्य समिती

सभापती गोरनाक बाळकृष्ण काशिनाथ

पाणीपुरवठा व जलनिस्सारण समिती



सभापती : वाघे हरिदास पांडुरंग

स्वच्छता, वैद्यकीय, दिवाबत्ती व सार्वजनिक आरोग्य समिती

सभापती : गुरव अनंत लक्ष्मण

महिला व बालकल्याण समिती सभापती : मुरकर राजसी

उपसभापती :. चोगले सुप्रिया कैलास

`. नगराध्यक्ष अतुल चौगुले यांनी सर्व नवनियुक्त सभापती व सदस्यांचे अभिनंदन करून समन्वय, पारदर्शकता व लोकहिताला प्राधान्य देत काम करण्याचे आवाहन केले.

# अलिबाग नगर परिषदेत समित्यांवर विरोधकांना डावलले

## भाजपचे नगरसेवक ॲड. अंकित बांगरा यांचा आरोप

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग नगर परिषदेत नुकत्याच स्थापन करण्यात आलेल्या विविध समित्यांमध्ये विरोधी पक्षाच्या नगरसेवकांना डावलले, असा आरोप भाजपचे नगरसेवक ॲड. अंकित बंगेरा यांनी केला. अलिबाग येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

नियमानुसार प्रत्येक समितीत किमान पाच सदस्य असणे आवश्यक असताना काही समित्यांमध्ये केवळ चारच सदस्यांची नेमणूक करण्यात आली आहे. विशेष बाब म्हणजे स्वीकृत



सदस्यांनाही समित्यांमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे, मात्र भविष्यात समितीच्या बैठकीत कोणत्याही विषयावर मतदानाची वेळ आली, तर स्वीकृत सदस्यांना मतदानाचा अधिकार नसतो. त्यामुळे समित्यांच्या निर्णय प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे, असे नगरसेवक ॲड. अंकित बांगरा यांनी स्पष्ट केले.

अलिबाग हे एक महत्त्वाचे पर्यटन स्थळ असल्याने शहराच्या विकासासाठी स्वतंत्र पर्यटन समिती तसेच दीर्घकालीन विकासाचा आराखडा तयार करण्यासाठी नियोजन समिती असणे अत्यावश्यक आहे, मात्र याबाबतही सत्ताधाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचा आरोप भाजपकडून करण्यात आला आहे. नगर परिषदेमधील समिती रचनेत पारदर्शकता आणि सर्व पक्षांचा समावेश होणे गरजेचे असून अन्यथा लोकशाही मूल्यांना तडा जात असल्याचेही ॲड. बंगेरा यांनी सांगितले.

# पनवेल रेल्वे स्टेशनच्या बाहेरुन दुचाकीची चोरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल रेल्वे स्थानकाचे बाहेर रेल्वेमेंन्टनेन्स डेपोच्या जवळ मोकळया जागेत पार्क करून ठेवलेली बुलेट अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे.

साईनगर येथील प्रणव पवार यांनी त्यांची एक लाख रुपये किमतीची बुलेट मोटारसायकल पनवेल रेल्वे स्थानकाचे बाहेर पार्क करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने ती मोटारसायकल चोरून नेली. याबाबत प्रणव पवार यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# वाशीमध्ये पालिकेची कारवाई जोरात

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वाशी विभाग कार्यालयांतर्गत फेरीवाले तसेच नागरी वस्तीत रस्त्यावर बसलेल्या तसेच पदपथ अडवून येण्याजाण्याचा मार्ग रोखून देणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात येत आहे.

वाशी विभागात अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या तब्बल १६ उसाचा रस विक्री करणाऱ्या चरख्यांवर कारवाई करण्यात आली. वाशी विभागाचे सहाय्यक आयुक्त सुखदेव येडवे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण पथकाने हे कारवाई केली.वाशी सारख्या मध्यवर्ती भागात विनापरवाना व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांसह इतर व्यवसायिकांवर



यापुढे देखील कारवाई करण्यात येईल असे सहाय्यक आयुक्त येडवे यांनी सांगितले. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून येणारे शेतकरी आपल्या कुटुंबासाठी उसाचा रस बैलगाड्यावर विकून हे चार महिने गुजराण करतात.

# मुरूड जंजिरा नगरपालिका विषय समित्यांची निवड बिनविरोध

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड नगरपरिषदेच्या सर्व विषय समिती सभापतीपदी निवडीत शिवसेना शिंदे गटाचे वर्चस्व दिसून आले.शिवसेनेने सर्वाधिक १२ नगरसेवक असल्याने नगरपरिषद सभागृहात त्यांचेच वर्चस्व दिसून आले.सर्व विषय समिती सभापती पद शिवसेनेच्या नगरसेवक यांना प्राप्त झाले आहे.पुरेसे संख्याबळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडे नसल्याने सर्व विषय समिती निवडणूक बिनविरोध झाली आहे.शिवसेनेचे सर्व सभापती



विविध विषय समितीवर नियुक्त झाले आहेत.

अजितपवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्षा आराधना मंगेश दांडेकर ह्या स्थायी समितीच्या अध्यक्षा असणार आहेत.शिंदे शिवसेना पक्षांचे उपनगराध्यक्ष विरेंद्र दत्तात्रेय भगत यांच्या कडे आरोग्य व शिक्षण समिती सभापती तर. सदस्य अंकिता दिपेश गुरव,ड. रुपेश शंकर पाटील, आदेश हरिश्चंद्र दांडेकर,तमिम ढाकम यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

बांधकाम व दिवाबत्ती समिती सभापती यास्मिन जाहिद कादिरी, तर सदस्य ड.रुपेश शंकर पाटील, नितिन नामदेव आंबुर्ले, आदेश हरिश्चंद्र दांडेकर, मनोज हरिश्चंद्र भगत, यांची बिनविरोध निवड करण्यात आली पाणी पुरवठा व जलनि:सारण समिती सभापती पांडुरंग कृष्णा आरेकर तर सदस्य मनिष मोहन विरकुड,विजय शंकर पाटील,रुपेश रमेश पाटील,प्रीती प्रविण चौलकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

नियोजन व पर्यटन विकास समिती सभापती – रुपेश रविंद्र रणदिवे, तर सदस्य वैदेही प्रकाश आरेकर, श्रीकांत नारायण खोत, श्रध्दा चंद्रकांत अपराध, प्रमिला सुभाष माळी यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

महिला व बालकल्याण समिती सभापती – नगमाना इम्तियाज खानजादे उप सभापती– सुगंधा पांडुरंग मकु, तर सदस्य अंकिता दिपेश गुरव,देवायानी देवेंद्र गुरव, प्रांजली चेतन मकु यांची बिनविरोध निवड झाली.



**उरण : श्री गणेश जयंती (माघी) निमित्ताने कामगार नेते सुधीर घरत व शैलेजा सुधीर घरत (उरण) यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले गणराज.**

# रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत अलिबाग येथे मोफत नेत्र व आरोग्य तपासणी शिबिर

**अलिबाग :** रस्ता सुरक्षा अभियान – जानेवारी २०२६ अंतर्गत अलिबाग कॅम्प येथे शुक्रवारी (दि. २३) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पेण–रायगड यांच्या वतीने मोफत नेत्र तपासणी व सर्वसाधारण आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरामध्ये ९० नागरिकांची मोफत नेत्र तपासणी तर ७८ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. हा उपक्रम उप प्रादेशिक परिवहन अधिकारी माधव सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

तपासणी पथकात वैद्यकीय अधिकारी डॉ. श्वेता कार्वेकर, डॉ. राजाराम हुलवान तसेच नेत्र चिकित्सा अधिकारी डॉ. श्रद्धा कुदळे यांनी नागरिकांची तपासणी केली.

# 'शिस्तभंगविषयक कार्यवाही पुस्तक शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी उपयुक्त'

**पुणे : प्रतिनिधी**

भारतीय प्रशासन सेवेतील निवृत्त अधिकारी आणि महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरणाचे माजी उपाध्यक्ष श्रीधर दत्तात्रय जोशी यांनी लिहिलेले 'शिस्तभंगविषयक कार्यवाही'– म.ना.से.( शिस्त व अपील) नियम १९७९ हे पुस्तक शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्याकरता अत्यंत उपयुक्त आहे, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनीचे ( यशदा) महासंचालक निरंजनकुमार सुधांशू यांनी येथे केले. 'शिस्तभंगविषयक कार्यवाही'– म.ना.से.( शिस्त व अपील) नियम १९७९' या पुस्तकाच्या सहाव्या आवृत्तीच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनीने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. पुस्तकाचे लेखक जोशी यांनी अनेक वर्ष अभ्यास करून आणि परिश्रम घेऊन हे पुस्तक लिहिले असून साध्या, सोप्या शब्दात जोशी यांनी अत्यंत महत्त्वाची माहिती पुस्तकात दिली आहे. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागातर्फे 'यशदा' संस्थेत 'चौकशी अधिकारी' यांच्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमात उपस्थित प्रशिक्षणार्थींना या पुस्तकाची पाचवी आवृत्ती संदर्भ ग्रंथ म्हणून भेट देण्यात आली होती, अशी माहितीही सुधांशू यांनी दिली. लेखक श्रीधर दत्तात्रय जोशी म्हणाले, शिस्तभंग विषयक कार्यवाही– राज्य घटनेतील तरतुदी कलम ३११, महत्त्वाचे न्यायालय निर्णय, प्रलंबित विभागीय, न्यायिक कार्यवाही– पदोन्नतीप्रक्रिये संदर्भातील अनुषंगिक प्रश्न, प्रलंबित विभागीय, न्यायिक कार्यवाही व सेवानिवृत्तीवेतन विषयक लाभ इत्यादी नवी प्रकरणे पुस्तकाच्या सहाव्या आवृत्तीत देण्यात आली आहेत. तसेच माझ्या 'कर्मचारी व अधिकारी मित्र' या युट्यूब चॅनेलची माहिती देण्यात आली आहे. 'यशदा'च्या प्रकाशन विभागाचे प्रकल्प संशोधक व्यंकटेश कल्याणकर यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमासाठी 'यशदा'चे अधिकारी आणि भारतीय प्रशासन सेवेतील निवृत्त अधिकारी उपस्थित होते. पुस्तकात १ जानेवारी २०२६ पर्यंतचे सुधारित नियम, महत्वाचे शासन निर्णय/परिपत्रके, न्यायालयीन निर्णय याचा अंतर्भाव करण्यांत आला आहे.




# फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयात मतदार जागृती

**उरण : प्रतिनिधी**

राष्ट्रीय मतदार दिन २५ जानेवारी २०२६ च्या निमित्ताने रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कॉलेज, फुंडे येथे मतदार जागृती भित्तीपत्रक चे उद्घाटन उपजिल्हाधिकारी तथा मतदान अधिकारी आवीष कुमार सोनोने ह्यांच्या हस्ते करण्यात आले. सदर भित्तिपत्रके इलेक्ट्रोल लिटरसी क्लब व राज्यशास्त्र विभागा च्या विद्यार्थ्यांनी तयार केले होते.

याप्रसंगी मुलांचे तहसीलदार उद्धव कदम यांनी मतदानाची शपथ वाचून नव मतदार विद्यार्थ्यांनाही शपथ घ्यायला लावली. तसेच उप जिल्हाधिकारी सोनोने यांनी उपस्थित नव मतदार विद्यार्थी यांना मतदानाचा हक्क सर्वांनी बजावा यासाठी समाजात जागरूकता निर्माण करणे साठी आवाहन केले

या रॅलीत उपजिल्हाधिकारी तथा मतदान अधिकारी आविष कुमार सोनोने,तहसीलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी डॉ. उद्धव कदम, नायब तहसीलदार प्रभाकर नवाळे यांच्यासह कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, प्रा. राम गोसावी, डॉ. राजकुमार कांबळे, डॉ संदीप घोडके, उपप्राचार्य गजानन चव्हाण यांनी सहभाग घेतला.



# खोपोली नगर परिषदेच्या विविध समिती सभापतींची निवड

खोपोली : प्रतिनिधी

येथील नगर परिषदेच्या विविध समिती सभापतीची निवड सभा मुख्याधिकारी डॉक्टर पंकज पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाली, यावेळी नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे व उपनगराध्यक्ष विक्रम साबळे उपस्थित होते.

स्थायी समिती. –नगराध्यक्ष व विविध समिती सभापती हे कायम निमंत्रित,त्याप्रमाणे सदस्यपदी विनायक तेलवणे, संदीप पाटील, व हरीश काळे यांची निवड एकमताने करण्यात आली आहे. नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे व मुख्याधिकारी डॉक्टर पंकज पाटील यांनी सर्व सभापतींचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करताना शुभेच्छा दिल्या.

या सभेत शिवसेना भाजप यांची संख्या त्याचप्रमाणे शरद पवार गटाच्या सुवर्णा मोरे यांनी महायुतीला बाहेरून पाठिंबा दिल्याने महायुतीचीं सदस्य संख्या पुरेशी झाल्याने राष्ट्रवादी गट शेकाप यांना सभापती पदापासून वंचित राहावे लागले असे बोलले जात आहे त्यामुळे या सभेला राष्ट्रवादी व शेकाप गट गैरहजर राहिल्याचे बोलले जात आहे.

**खोपोली नगर परिषद सभापती**

स्थायी समिती–नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे

पाणीपुरवठा विभाग– विक्रम साबळे (उपनगराध्यक्ष )

आरोग्य सभापती –मयुरी शेलार.

शिक्षण सभापती – अमित फाळे.

बांधकाम सभापती – अनिल सानप

महिला व बालकल्याण – सुवर्णा मोरे.

नियोजन सभापती – प्रतीक्षा रेटरेकर

परिवहन सभापती – किशोर पाटील

## निवडक

### सहा तोळ्याच्या सोन्याच्या गंठणची चोरी

**नवीन पनवेल :** सहा तोळ्याच्या सोन्याच्या गंठणची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला कैलास टिंगरे हे सेक्टर २ इ, कळंबोली येथे राहत असून त्यांचा पत्नीने सोन्याची गंठण घरातील किचन मधील कुकरमध्ये ठेवली होती. ८ जानेवारी रोजी त्यातील सोन्याची गंठण अनोळखी ईसमाने घराचा दरवाजा चावीने निवडून चोरी करून नेली.

### नेरे येथून महिला बेपत्ता

**पनवेल :** नेरे येथील शिल आश्रम येथून आश्रमातील कर्मचाऱ्यांची नजर चुकवून एक ५० वर्षीय मनोरुग्ण महिला



बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे. सारा असे या महिलेचे नाव असून तीची उंची ५ फुट, केस काळे, पुरुषासारखे कापलेले, डोळे काळे, रंगाने सावळी, चेहऱ्यावर डावे बाजुला गालावर गोलाकार केस आलेले, अंगात पिवळ्या रंगाचा गाउन आहे. सदर महिलेबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार अमर भालसिंग यांच्याशी संपर्क साधावा.

### अल्युमिनियम प्लेट चोरणारा ताब्यात

**पनवेल :** पनवेल परिसरात कंपनीच्या आवारातून अल्युमिनियम प्लेटची चोरी करणाऱ्याला पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पनवेल तालुक्यातील पळस्पे फाटा येथील मॅराथॉन रियालीटी प्रा. लि कपंनीच्या आवारात असलेली १० हजार रुपये किमतीची अल्युमिनियम प्लेटची चोरी झाल्याची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. त्यानुषंगाने पोलिसांनी तपास करून आरोपी शंकर कातकरी (वय २५) याला पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

### रिक्षाची कंटेनरला धडक; दोघांचा मृत्यू

**पनवेल :** मुंबई गोवा महामार्गावर विठठल कामत हॉटेलजवळ चिंचवण गांव रस्त्याचे मध्ये भरधाव जाणाऱ्या रिक्षाने रस्त्याच्या मधोमध उभे असलेल्या कंटेनरला जोरदार धडक दिली. या धडकेत मुंब्रा येथील दोघांचा मृत्यू झाला आहे तर दोघे गंभीर जखमी झाले आहे. मुंबई गोवा महामार्गावर चिंचवण गांव जवळ कंटेनर (एमएच ४६ बीएम ३४५५) वरील चालक याने रात्रीच्या सुमारास त्याचे ताब्यातील रस्त्याचे मध्ये वाहतुकीस अडथळा होईल असे लावले होते. यादरम्यान येणाऱ्या रिक्षाने या कंटेनरला धडक दिली. या धडकेत रिक्षाचालक रफिक अन्सारी(वय ४०), फातीमा अन्सारी (वय २०) यांचा जागीच मृत्यू झाला तर शहनाज अन्सारी (वय ४०), सुमया अन्सारी (वय ०९) हे गंभीर जखमी झाले आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पोलिसांनी कंटेनर चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# रस्ता सुरक्षा अभियान

## प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा उपक्रम

**नवीन पनवेल : वार्ताहर**

३६वे रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरीता रस्ता सुरक्षा विषयक कार्यशाळा आज दिनांक २२ जाने. २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता, भारती विद्यापिठ, खारघर येथे संपन्न झाली.



या कार्यक्रमाकरीता विजय सुर्यवंशी (भा.प्र.से.) विभागीय आयुक्त, कोकण, हार्दिक जोशी (ऊर्फ राणा दादा), प्रसिध्द सिने अभिनेते, जयंत रमेश चव्हाण, प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल, मोहन अवस्थी, प्राचार्य, भारती विद्यापीठ, खारघर, हरिभाऊ जेजुरकर, सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल, निलेश धोटे, विनय मोरे, सारथी सुरक्षा सेवा संस्था, नवी मुंबई, विवेक खाडे, उपाध्यक्ष, आम्ही एकत्र श्रमीक संघटना, पनवेल इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सुरूवातीला महाविद्यालयातील उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना प्रोजेक्टरद्वारे रस्ता सुरक्षा विषय सखोल मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाची प्रस्तावना पृथ्वीराज काकडे, मो. वा. निरीक्षक यांनी केली.

मोहन अवस्थी, प्राचार्य, भारती विद्यापीठ, खारघर यांनी सर्व विर्द्यार्थ्यांना महाविद्यलयाच्या परिसरात व रस्त्यावर वाहन चालवितांना वाहतुक नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले. मराठी सिने सृष्टीतील प्रसिध्द अभिनेते हार्दिक जोशी यांनी त्यांच्या भाषणात खास शैलीत सर्व उपस्थितांचे मागर्दशन केले, तसेच सिने सृष्टीतील कलाकार शुटींग करतांना व वास्तविक जीवनात वाहतुकीच्या नियमांचे पालन करीत असल्याचे नमूद केले. विजय सुर्यवंशी, विभागीय आयुक्त, कोकण यांनी सर्व उपस्थितांना अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी दुचाकी चालवितांना हेल्मेट परिधान करावे, चारचाकी वाहन चालवितांना वाहतुक नियमांचे काटेकोरपणे करण्याचे आवाहन केले.

**पनवेल : तालुक्यातील शिवाजीनगर येथे श्री समर्थ सद्गुरू बाळकृष्ण महाराज मंदिरात गुरुवार गिरिमल्लेश्वर महाराज यांची पुण्यतिथी तसेच गणेश जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आवर्जून भेट देत दर्शन घेतले. या वेळी ठाकूर परिवारातील सदस्य तसेच ग्रामस्थ मंडळ शिवाजीनगरचे पदाधिकारी उपस्थित होते. हा कार्यक्रम देवसागर साधक समाज, इंचगिरी संप्रदाय यांच्या वतीने आयोजित केला होता.**





**पनवेल : शाहू इन्स्टिट्युटचे जयंत भगत, सौरभ भगत यांच्या बालाजी अंगण येथील घरी भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी भेट देत गणपती दर्शन घेतले.**

# सीकेटी विद्यालयात मराठी कवितांचा उत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार,(दि.२३) रोजी तालुका स्तरावर मराठी काव्यवाचन स्पर्धा चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नवीन पनवेल या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती . या स्पर्धेचे उद्घाटन वर्षा प्रशांत ठाकूर (कार्यकारिणी मंडळ सदस्या)यांच्या हस्ते करण्यात आले.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. कार्यक्रम अध्यक्षा वर्षा ठाकूर यांनी या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांची भाषाशैली ताल उच्चारण लय विकसित होईल असे मत त्यांनी मांडले यावेळी नगरसेविका अस्मिता घरत,माजी शिक्षिकासुलभा निंबाळकर,मुख्याध्यापक संतोष चव्हाण ,सुभाष मानकर कैलास सत्रे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे उपस्थित होते विद्यालयात विद्यार्थ्यांच्या साहित्यिक कलागुणांना वाव देण्यासाठी काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या तालुकास्तरीय स्पर्धेला विविध शाळातील विद्यार्थ्यांचा, शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

इयत्ता आठवी ते दहावीतील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला त्यानंतर विद्यार्थ्यांनी आई,देशभक्ती, मातृभाषा, मानवता या विषयांवरील कविता प्रभावी व भावपूर्ण पद्धतीने सादर केल्या. विद्यार्थ्यांच्या सुस्पष्ट उच्चार, योग्य आवाजातील चढउतार व आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून.देवेंद्र इंगळकर व माधवी मोतीलिंग यांनी काम पाहिले.

या काव्यवाचन स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेप्रती प्रेम, साहित्याची गोडी व व्यासपीठावर व्यक्त होण्याची क्षमता वाढल्याचे समाधान उपस्थितांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ दिवेकर मॅडम यांनी केले सांस्कृतिक समितीच्या प्रमुख सौ स्वाती पाटील मॅडम ,उपप्रमुख सौ राधिका शिर्के मॅडम, सर्व शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या विशेष मेहनतीमुळे कार्यक्रम यशस्वी झाला. विजेते स्पर्धक पुढीलप्रमाणे प्रथम क्रमांक –स्मित कुंदन मोकल द्वितीय क्रमांक –श्रेया भगत ,तृतीय क्रमांक –सिया पाटील खारघर







**पनवेल : माघी गणेश जयंतीनिमित्त गुरुवारी लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी तालुक्यातील विविध ठिकाणी भेटी देत गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, सरपंच विजेंद्र पाटील, उपसरपंच शैलेश पाटील, माजी सरपंच हरेश्वर म्हात्रे, नरेश मोकल, भाजपचे जिल्हा सरचिटणीस व नवनिर्वाचित नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार, ॲड.मनोज भुजबळ, माजी नगरसेवक अनिल भगत, नगरसेविका राजश्री वावेकर, अस्मिता घरत, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेविका वर्षा नाईक व सुशीला घरत, जगदीश घरत, मयूर कदम, जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, कामगार नेते रवी नाईक, नगरसेवक, निलेश घरत यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

# ‘आरटीपीएस’मध्ये आंतरगृह नृत्य स्पर्धा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**




रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघरच्या आवारात २३ जानेवारी रोजी इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी रंगतदार व उत्साहपूर्ण आंतरगृह नृत्य स्पर्धा यशस्वीरित्या पार पडली. या स्पर्धेत लाल, निळा, पिवळा आणि हिरवा या चारही गृहांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विद्यार्थ्यांची कला, समन्वय आणि रंगमंचावरील आत्मविश्वास प्रभावीपणे सादर केला.

या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून वर्षा ठाकूर मॅडम, JBSP संस्थेच्या सदस्या व इनर व्हील क्लबच्या मान्यवर सदस्या उपस्थित होत्या. त्यांच्या प्रेरणादायी उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांना मोठे प्रोत्साहन मिळाले. त्यांनी विजेत्यांना पारितोषिके प्रदान करत शिक्षक व विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

ही स्पर्धा प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक परीक्षकांकडून परीक्षित करण्यात आली. ताल, भावाभिव्यक्ती, सुसूत्रता व एकूण सादरीकरण या निकषांवर परीक्षण करण्यात आले. प्रत्येक गृहाने सर्जनशीलता आणि मेहनतीचा प्रत्यय देणारी सुंदर नृत्य सादरीकरणे सादर केली.

विद्यार्थ्यांना प्रेम, संयम आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शन देणाऱ्या गृहशिक्षकांचे विशेष कौतुक करण्यात आले, ज्यांच्या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने व आनंदाने सादरीकरण केले.स्पर्धेचे निकाल पुढीलप्रमाणे: पिवळेगृह–प्रथमक्रमांक ,निळे व हिरवे गृह – संयुक्त द्वितीय क्रमांक ,लाल गृह – तृतीय क्रमांक

या प्रसंगी मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे सहभागाबद्दल अभिनंदन केले व शाळेसाठी प्रत्येक विद्यार्थी विजेता असल्याचे सांगून अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडतो, असे प्रतिपादन केले. हा कार्यक्रम आनंददायी व संस्मरणीय वातावरणात झाला असून संघभावना, सर्जनशीलता आणि आरोग्यदायी स्पर्धेचा उत्सव साजरा करण्यात आला.



**पनवेल : प्रभाग क्रमांक १७ मधून महायुतीच्या उमेदवार शिवानी घरत यांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवून नगरसेविका म्हणून निवडून येण्याचा मान पटकावला आहे. विजयानंतर गुरुवारी नवनिर्वाचित नगरसेविका शिवानी घरत यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. या वेळी माजी नगराध्यक्ष सुनील घरत यांच्यासह अनेक मान्यवर व पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.**

# काव्यवाचन स्पर्धेत प्रथम स्मित मोकलचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पनवेल येथील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या माध्यमिक विभागा (मराठी माध्यम ) च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या काव्यवाचन स्पर्धेत खुल्या गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला. याबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजचा इयत्ता आठवी मध्ये शिकणारा विद्यार्थी स्मित कुंदन मोकल याचे लोकनेते रामशेठ



ठाकूर यांचे हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरवपूर्ण आभिनंदन करण्यात आले.

यावेळी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य व जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी.देशमुख,रयत च्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या व गव्हाण विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर व कुंदन मोकल आदी उपस्थित होते.नवीन पनवेल येथील सी.के.टी.विद्यालयात शुक्रवार दिनांक २३ जानेवारी रोजी संपन्न झालेल्या मराठी भाषेतील काव्यवाचन स्पर्धेमध्ये स्मित मोकल याने सादर केलेल्या ' आई ' या कवितेने रसिक प्रेक्षकांच्या काळजाचा ठाव घेत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. कवितेच्या अप्रतिम सादरीकरणामुळेप्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल त्याचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

यावेळी संस्थेच्या विश्वस्त वर्षाताई प्रशांत ठाकूर,के. आ.बांठीया हायस्कूलच्या सेवानिवृत्त मराठी विषय शिक्षिका सुलभा विजयसिंह निंबाळकर, पनवेल महानगर पालिकेच्या नवनिर्वाचित नगरसेविका कु.अस्मिता जगदीश घरत,सी.के.टी. विद्यालयाचे प्राचार्य कैलास सत्रे व मान्यवर उपस्थित होते. स्मित मोकल याला गव्हाण विद्यालयाचे उपशिक्षक कवी सागरकुमार रंधवे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

### अज्ञात वाहनाची दुचाकीला धडक, तरुणाचा मृत्यू

**नवीन पनवेल :** अज्ञात वाहनाने मोटरसायकलला दिलेल्या धडकेत २५ वर्षीय सुमित सुरेंद्र झा याचा मृत्यू झाला. या अपघाता प्रकरणी २१ जानेवारी रोजी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. सुमित सुदर्शन झा हा उलवे, सेक्टर १६ येथे राहत असून आठ जानेवारी रोजी होंडा कंपनीची एसपी १२५ मोटरसायकल घेऊन तो कामानिमित्ताने बाहेर गेला होता. जेएनपीटी रोड जेडब्ल्यू आर कंपनीच्या समोर कुंडेवहाळ या ठिकाणी अज्ञात वाहनाने त्याच्या मोटरसायकलला धडक दिली. या धडकेत सुमित झा गंभीर जखमी झाला. त्याला जे जे हॉस्पिटल, मुंबई येथे दाखल करण्यात आले होते.



**पनवेल : महानगरपालिका क्षेत्रात माघी गणेशोत्सवानिमित्त गुरुवारी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी विविध गणेश मंडळांना भेटी देत श्री गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले घेतले. या वेळी त्यांनी उपस्थित भाविकांशी आणि मंडळाच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत सर्वांना माघी गणेश जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस व नवनिर्वाचित नगरसेवक नितीन पाटील, पनवेल शहराध्यक्ष व नवनिर्वाचित नगरसेवक सुमित झुंजारराव, नगरसेवक नरेश ठाकूर, शत्रुघ्न काकडे, अजय बहिरा, कळंबोलीचे माजी शहराध्यक्ष रवींद्र पाटील, नगरसेविका प्रमिला पाटील, नगरसेवक अमर पाटील, रवींद्र भगत, भाजपचे नेते दिनेश खानावकर, सतीश पाटील, माजी नगरसेवक गुरूनाथ गायकर यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## संपादकीय

# फटका बांगलादेश क्रिकेटलाच

मुस्तफिजूर रहमानला आयपीएलमधून वगळल्याने बांगलादेश क्रिकेट बोर्डाने प्रतिष्ठेचा विषय करत टी-२० विश्वचषक स्पर्धेतील त्यांचे सामने श्रीलंकेत खेळवावेत अशी भूमिका घेतली होती, मात्र आयसीसीने बांगलादेशची ही मागणी धुडकावून लावल्यानंतर बांगलादेशने भारतात विश्वचषकाचे सामने न खेळण्याची भूमिका घेतली आहे. या निर्णयाचे दूरगामी परिणाम बांगलादेश क्रिकेटवरच होतील.

**आयपीएलमधील आपल्या एकमेव खेळाडूला, मुस्तफिजूर रहमानला वगळण्याच्या आदेशावरून बांगलादेश क्रिकेट बोर्ड आणि बांगलादेश सरकार या दोघांनीही भारतातील टी-२० विश्वचषकाचे सामने खेळणार नाही अशी भूमिका घेतली. भारत आणि बांगलादेश या दोन्ही देशांतील वाढत चाललेल्या तणावानंतर बांगलादेशने आपल्या खेळाडूंच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त करून भारतात खेळण्यास असलेला आपला विरोध उघड केला. परंतु आयसीसीने भारतातील सुरक्षा व्यवस्थेबाबत माहिती घेऊन बांगलादेश क्रिकेट बोर्डाने मांडलेली सुरक्षिततेची समस्या गंभीर नसल्याचे म्हणत टी-२० विश्वचषक स्पर्धा ठरलेल्या कार्यक्रमानुसारच होईल अशी भूमिका घेतली. आयसीसीच्या १५ सदस्यांपैकी बांगलादेश क्रिकेट बोर्डाच्या प्रस्तावाला फक्त पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने पाठिंबा दिला. आगामी टी-२० विश्वचषकातून बाहेर पडण्याच्या बांगलादेशच्या या भूमिकेमुळे बांगलादेश क्रिकेटवरच दूरगामी परिणाम होणार आहेत. भारत आणि बांगलादेश या दोन्ही देशांदरम्यानचा तणाव वाढत चालला असून त्या पार्श्वभूमीवर बांगला देश सरकारने सुरक्षिततेचे कारण पुढे करून भारतात होणाऱ्या टी-२० विश्वचषक स्पर्धेतून माघार घेण्याची सूचना त्यांच्या क्रिकेट बोर्डाला केली. पण या निर्णयामुळे बांगलादेशच्या क्रिकेटपटूंचे आणि क्रिकेटचे भवितव्य आगामी काळात धोक्यात येऊ शकते. क्रिकेटला अशातऱ्हेने राजकारणाशी जोडणे हेच मुळात चुकीचे आहे. सुरक्षेचे कारण पुढे करत त्या देशाने भारतात खेळले जाणारे सामने अन्यत्र हलवण्याची मागणी आयसीसीकडे केली. ही मागणी फेटाळली जाताच त्यांनी थेट 'आम्ही भारतात खेळणारच नाही' अशी भूमिका घेतली. बांगलादेश या स्पर्धेतून बाहेर पडल्यास त्यांच्या जागी आयसीसी रँकिंगच्या आधारे स्कॉटलंडला खेळण्याची संधी मिळू शकते. टी-२० विश्वचषकात बांगलादेश संघाचे चारही साखळी सामने भारतात नियोजित होते. वास्तविक बांगलादेशात सध्या अराजकसदृश परिस्थिती असून तेथील अल्पसंख्याक हिंदूंना लक्ष्य करून त्यांच्यावर प्राणघातक हल्ले होत आहेत. या पार्श्वभूमीवर अलीकडेच बीसीसीआयने कोलकाता नाईट रायडर्सला ('केकेआर'ला) मुस्तफिजूर रहमानला टीममधून काढून टाकण्यास सांगितले. मुस्तफिजूरला टीममधून काढल्यानंतर बांगलादेशच्या हंगामी सरकारचे क्रीडाविषयक सल्लागार आसिफ नजरूल यांनी, बांगलादेशच्या क्रिकेटपटूंचा आणि देशाचा अपमान कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही, असे म्हटले होते. पाठेपाठ बांगलादेश क्रिकेट बोर्डाने टी-२० विश्वचषक स्पर्धेत खेळण्यासाठी आपला संघ भारतात जाणार नाही, असा निर्णय घेतला. बांगलादेशातील भारतद्वेष सध्या खूपच टोकाला गेला असून या देशाला जणु काही दुसरा पाकिस्तान व्हायचे आहे की काय असा प्रश्न तेथील एकंदर परिस्थिती पाहता पडावा. वास्तविक राजकारण आणि खेळ यांना एकमेकांपासून दूर ठेवायला हवे, परंतु परिस्थिती विकोपाला गेल्यावर क्रीडा संघटनांनाही काही गंभीर बाबी विचारात घ्याव्याच लागतात. टी-२० विश्वचषक स्पर्धेत न खेळल्याने नुकसान बांगलादेशचेच होणार आहे. स्पर्धेतील सहभागामुळे बांगलादेश क्रिकेट बोर्डाला जी रक्कम मिळणार होती, ती आता मिळणार नाही. त्याखेरीज कदाचित आयसीसीकडून बांगलादेश क्रिकेट बोर्डाला आर्थिक दंडही केला जाऊ शकतो.**

# ...म्हणून साजरा होतो राष्ट्रीय बालिका दिन



राष्ट्रीय बालिका दिन म्हणजे २४ जानेवारी हा दिवस भाविकांसाठी, महिलांसाठी खूप महत्वाचा आहे. महिला व बालविकास मंत्रालयाने इ. सन २०००पासून देशभर राष्ट्रीय बालिका दिन साजरा केला. या मोहिमेद्वारे भारतीय समाजात मुलींमधील असमानता ओळखली गेली आहे, म्हणूनच २४ जानेवारी हा दिवस आपण बालिका दिन म्हणून साजरा करतो.

प्रत्येक वर्षी २४ जानेवारी रोजी 'राष्ट्रीय बालिका बाल दिन' बाल वर्गासाठी राष्ट्रीय कार्य दिन म्हणून साजरा करतात. देशातील मुलींना अधिक सहकार्य आणि नवीन संधी उपलब्ध करून देण्यासाठी हा दिवस साजरा करण्यात आला होता. समाजातील मुलींनी केलेल्या सर्व असमानतेचा सामना करण्यासाठी लोकांमध्ये जागरूकता वाढविण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

मुलींचे जीवन सुधारण्यासाठी आणि समाजातील मुलींचा दर्जा वाढविण्यासाठी राष्ट्रीय लोक बालदिन सामाजिक लोकांमध्ये साजरा केला जातो. मुलींना त्यांच्या जीवनात दररोज अनेक संकटांचा सामना करावा लागतो .आपल्या समाजामधून विविध प्रकारचे सामाजिक भेदभाव आणि मुलींचे होणारे शोषण पूर्णपणे बंद केले पाहिजे आणि मुलींनादेखील सर्वसामान्यांसारखे समान अधिकार हक्क मिळाले पाहिजे. यासाठीच आपण बालिका दिवस हा साजरा करीत असतो. मुलींना अधिक सुरक्षित चांगले ऊर्जावान वातावरण मिळणे आवश्यक आहे त्यांना जीवनातील प्रत्येक हक्क आणि कायदेशीर अधिकाराची जाणीव असली पाहिजे. त्यांना हे माहीत असणे आवश्यक आहे की त्यांना योग्य शिक्षण पोषण आणि आरोग्य काळजी घेण्याचा हक्क आहे.

त्यांच्या जीवनात त्यांना असलेले हक्क मिळवण्यासाठी आणि सर्व आव्हानांना सामोरे जाण्यासाठी बालविवाह प्रतिबंधक कायदा, हुंडाविरोधी कायदा, घरी होणारा हिंसाचार, अत्याचार यासारख्या कायद्याविषयी त्यांना चांगल्याप्रकारे माहिती असावी.

महिला व बाल विकास मंत्रालयाकडून राष्ट्रीय व राज्य स्तरावर बरीच पावले उचलली जातात, जेणेकरून मुलींचे शोषण बंद होईल, आता महिला व बालविकास मंत्रालयाने अनेक योजना चालू केल्या आहेत. जसे की धनलक्ष्मी नावाची योजना, सुकन्यासमृद्धी योजना अशा अनेक योजनेअंतर्गत मुलींच्या शिक्षण पालन-पोषण देखभाल संरक्षण या मूलभूत इच्छांची पूर्तता केली जाते.

शिक्षण कायद्यात मुलींसाठी मोफत शिक्षण देखील दिले जाते. जेणेकरून प्रत्येक घरातील प्रत्येक मुलगी ही शिक्षण घेऊ शकेल. आणि ती शिक्षित होऊ शकेल. कारण एक मुलगा शिकला तर एक व्यक्ती शिकतो, पण जर एक मुलगी शिकली तर संपूर्ण कुटुंब हे शिक्षित होत असतं. शिकत असतं म्हणून मुलींसाठी शिक्षण कायद्यात दुरुस्त करून प्रत्येक मुलीला मोफत शिक्षण हे दिले जाते.

महिला व बालविकास मंत्रालयाने इ. सन २०००पासून देशभर राष्ट्रीय बालिका दिन साजरा केला. या मोहिमेद्वारे भारतीय समाजात मुलींमधील असमानता ओळखली गेली आहे, म्हणूनच २४ जानेवारी हा दिवस आपण बालिका दिन म्हणून साजरा करतो. जेणेकरून मुलींमधील असमानता कमी होऊन मुलींना समान न्याय आणि दर्जा मिळेल.

**(साभार : मराठी महिला)**

# भारतीय भौतिकशास्त्रज्ञ डॉ. होमी जहांगीर भाभा

डॉ. भाभा केवळ शास्त्रज्ञ नव्हते. तर ते संगीत, कला, नृत्य व साहित्यामध्येही रुची असणारे अवलिया होते. खरे सांगायचे तर ते भारताचे 'लिओनार्दो दा विंची' आहेत असे कोणाचेही कौतुक सहसा न करणारे उद्गार नोबेल पुरस्कार विजेते सर सी. व्ही. रामन यांनी काढले होते. १९४१मध्ये नागपुरात झालेल्या इंडियन सायन्स अकादमीच्या वार्षिक बैठकीत डॉ. रमण यांनी डॉ. होमी जहाँगीर भाभा यांची अशी ओळख करून दिली होती.

संशोधन व वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी सर सी. व्ही रामन यांनी १९३४मध्ये इंडियन सायन्स अकादमीची बंगळूर येथे स्थापना केली. १९४० मध्ये भाभा यांनी या संस्थेत विश्वकिरण



संशोधन विभागाचे प्रभारी प्रपाठकपद स्वीकारले. दरवर्षी भारतातील विविध शहरांमध्ये संस्थेद्वारे संशोधनासंबंधी बैठक आयोजित केली जात असे. देशातील निवडक शास्त्रज्ञ, संशोधक आपले संशोधन, रिसर्च पेपर सादर करीत असत. २५ आणि २६ डिसेंबर १९४१मध्ये नागपूर येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. 'रिसेंट डव्हान्स इन कॉस्मिक रे' या विषयावर डॉ. भाभा यांचा रिसर्च पेपर होता.भारतीय अणू कार्यक्रमाचे शिल्पकार डॉ. होमी जहांगीर भाभा यांचा जन्म ३० ऑक्टोबर १९०९ साली मुंबईतील एका पारशी कुटुंबात झाला. लहानपणापासूनच त्यांना विज्ञानावरील पुस्तकांच्या वाचनाची आवड होती. १९३० मध्ये त्यांनी केंब्रिज विद्यापीठातून इंजिनिअरची पदवी घेतली. १९४० साली डॉ. भाभा भारतात परतले व अणु ऊर्जा संशोधनावर काम सुरु केले.

जे.आर.डी. टाटांशी संपर्क साधून मुंबईत टाटा फंडामेंटल रिसर्च सेंटरची स्थापना केली. १९४८ साली त्यांनी पंतप्रधान नेहरूंच्या सहकार्याने अणुऊर्जा आयोगाची स्थापना केली. डॉ. भाभांच्या प्रयत्नांमुळेच १९६ साली ट्रॉम्बे येथे आशियातील पहिली अणुभट्टी 'अप्सरा' उभारण्यात आली. २४ जानेवारी १९६६ला व्हिएन्ना येथे आयोजित अणुऊर्जा परिषदेला उपस्थित राहण्यासाठी डॉ. भाभा निघाले होते. ते प्रवास करीत असलेल्या विमानाचा अपघात झाला. त्यात त्यांचा मृत्यू झाला.

डॉ. भाभा यांना अभिजात पाश्चात्त्य संगीताची विलक्षण आवड होती. ते उत्तम चित्रकार होते. त्यांनी स्थापन केलेल्या बहुतांश संशोधन संस्थांमध्ये त्यांनी सुंदर आणि कलात्मक उद्यानेही उभी केली आहेत. या संस्थांच्या इमारतींसाठीची जागा निवडतानाही त्यांनी त्या परिसराच्या निसर्गसौंदर्यालाही महत्त्व दिलेले आढळून येते.

ऊर्जा, कृषी आणि मेडिसिन क्षेत्रात अणुऊर्जा कार्यक्रमाचा उपयोग व्हावा, असे डॉ. भाभांनी सांगितले होते. अणुशक्तीच्या अर्थशास्त्राचाही त्यांचा दांडगा अभ्यास होता. अणुशक्तीद्वारे निर्माण केलेली वीज किफायतशीर आहे हे त्यांनी दाखवून दिले होते. विशेष म्हणजे डॉ. भाभा यांना तब्बल पाच वेळा भौतिकशास्त्रामध्ये नोबेलसाठी नामांकन मिळाले होते. विज्ञानातील त्यांचे विलक्षण योगदान लक्षात घेता तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी मुंबईतील अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून ते 'भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर' असे केले.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# एक महिन्यासाठी चॅट जीपीटी प्लस फ्री, ऑफर जाणून घ्या

ओपन एआय भारतात ChatGPT Plusची एक महिन्याची मोफत टेस्ट देत आहे. पहिल्यांदाच AI जायंटने आपल्या मेन सबस्क्रिप्शन प्लॅनसाठी अशी ऑफर दिली आहे. चला तर मग याविषयीची माहिती विस्ताराने जाणून घेऊया.




OpenAIने एक चांगली ऑफर सादर केली आहे, कंपनी मर्यादित वेळेची जाहिरात मोहीम चालवित आहे आणि लोकांना ChatGPT प्लस सबस्क्रिप्शनची एक महिन्याची विनामूल्य चाचणी देत आहे. ही ऑफर भारतातील युजर्ससाठी उपलब्ध असल्याची पुष्टी करण्यात आली आहे. ही ऑफर इतर देश आणि प्रदेशांमध्येदेखील उपलब्ध होण्याची शक्यता आहे. भारतीय युजर्ससाठी ही कंपनीची दुसरी ऑफर आहे.

यापूर्वी नोव्हेंबर २०२५मध्ये ChatGPT Go एक वर्षासाठी विनामूल्य करण्यात आले होते. सबस्क्रिप्शनच्या पहिल्या महिन्याची विनामूल्य चाचणी ही नवीन संकल्पना नसली तरी, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) जायंटने मुख्य सब्सक्रिप्शन प्लॅनसाठी अशी विनामूल्य ऑफर देण्याची ही पहिलीच वेळ आहे.

ही ऑफर प्रथम AIRPMचे लीड इंजिनिअर टिबोर ब्लाहो यांनी 'द'वरील पोस्टमध्ये या ऑफरची माहिती शेअर केली. गॅजेट्स ३६०च्या रिपोर्टनुसार ही ऑफर भारतात एक महिन्यासाठी फ्री प्रमोशन म्हणून उपलब्ध आहे. विशेष म्हणजे ही ऑफर केवळ विद्यमान युजर्ससाठीच नाही तर ज्यांनी यापूर्वी कधीही सदस्यता खरेदी केली नाही त्यांसाठीही आहे. जर एखाद्या युजर्सकडे ChatGPT Go सदस्यता असेल, तर तो युजर्स प्लसमध्येदेखील अपग्रेड करू शकतो.

याव्यतिरिक्त चाचणी कालावधीचा लाभ घेण्यापूर्वी आर्थिक माहिती (जसे की क्रेडिट कार्ड, यूपीआय किंवा नेट बँकिंग तपशील) शेअर करणे महत्त्वाचे आहे. याचा अर्थ असा की जर एखाद्या व्यक्तीने सदस्यता रद्द करण्याची काळजी घेतली नाही, तर ऑटो मॅन्डेटामुळे पुढील महिन्याचे शुल्क कापले जाईल.

या सबस्क्रिप्शनसह, कंपनीचे नवीन AI मॉडेल, सोरा-पावर्ड व्हिडिओ जनरेशन, चांगल्या संदर्भ धारणासाठी अधिक मेमरी आणि कोड लेखन आणि मदतीसाठी कोडेक्समध्ये प्राधान्य प्रवेश आणि उच्च दर मर्यादा. एका महिन्यासाठी जर एखाद्या व्यक्तीने ChatGPT प्लसचे सबस्क्रिप्शन खरेदी केले तर १९९९ रुपये शुल्क आकारले जाते.

# शास्त्रीय गायक पं. भीमसेन जोशी



**निमित्त**

संगीत ही मानवाला मिळालेली महत्वपूर्ण देणगी आहे. त्यातून माणसाच्या भावभावना , इच्छा , जीवनात आलेले नैराश्य या सर्व गोष्टीवर मात करता येऊ शकते. भारतीय संगीत परंपरेत अनेक कलाकारांचा मोठा वाट दिसून येतो. त्या वेळी आणि आजही संगीत हेच आपले जीवन मानणाऱ्या कलाकारांची भारतात कमतरता दिसत नाही. यातील एक असामान्य गायक पंडित भीमसेन जोशी. आज त्यांचा स्मृतिदिन. त्यानिमित्ताने घेतलेला आढावा.

भीमसेन जोशी यांचा जन्म ४ फेब्रुवारी १९२२ कर्नाटक येथील गदग या ठिकाणी झाला. भीमसेनजींचे वडील पेशाने शिक्षक होते. त्यामुळे भीमसेनजींचा संगीताकडे असणारा कल त्यांना आवडत नसे. त्यामुळे कालांतरानेआपली आवड जोपासण्यासाठी घर सोडावे लागले. त्यांनी पुढे उत्तर भारतात जाऊन उस्ताद अब्दुल करीमखाँ, वझेबुवा, केसरबाई केरकर या सारख्या अन्य उस्तादांकडे त्यांनी गायन-वादन शिकून घेतले. घरी आल्यानंतर त्यांच्या वडीलानी संगीताचा ओढा लक्षात घेऊन कुंदगोळ गावातील रामभाऊ कुंदगोळ यांच्याकडे शिकवणी चालू केली. रामभाऊ सवाई गंधर्व होते. त्यामुळे शास्त्रीय संगीत शिकवण्याकडे अधिक भर होता.पुढे त्यांनी लवकरच पुण्यातील हिराबागेत आपली पहिली संगीत मैफिल भरवली. विमान प्रवासांमुळे, त्यांना पु.ल. देशपांडे यांनी गमतीने 'हवाईगंधर्व' ही पदवी बहाल केली होती. कित्येक वेळा एकाच दिवसात दोन शहरांतील मैफली घेण्यासाठी ते दोनदा विमानप्रवास करीत असत. भीमसेन जोशींना हिंदुस्थानी शास्त्रीय गायन पद्धतीचे ख्याल गायक म्हणत असले तरी त्यांनी १९४०च्या दशकात लखनौमध्ये एक वर्ष राहून तेथील प्रसिद्ध गायकांकडून ठुमरी शिकून घेतली होती.

आपल्या गुरूच्या स्मरणार्थ त्यांनी १९५२ सालापासून सवाई गंधर्व संगीत महोत्सव सुरु केला होता. भीमसेन जोशींनी सुरवात जरी जाऊन केली होती तरीही त्यांना प्रत्येक गायनाचा प्रकार आवडायचा. त्यामुळे जयपूर येथील गंधर्व महाविद्यालयाने संगीताचार्य ही पदवी बहाल केली भारतात शास्त्रीय गायनाच्या हिंदुस्थानी आणि कर्नाटकी या दोन प्रमुख शाखा मानल्या जातात. भीमसेन जोशींचे वैशिष्ट्य असे की ते दक्षिण भारत प्रचलित असलेल्या कर्नाटकी गायनातल्या चीजा हिंदुस्थानी पद्धतीने गाऊन दाखवीत. त्यामुळे त्यांचे गायन कर्नाटकी संगीताची परंपरा असलेल्या दक्षिणी भारततही, विशेषतः तरुण पिढीमध्ये लोकप्रिय झाले.

पंडितजींनी आपल्या आयुष्यात सर्वांत जास्त प्रेम केलं असेल तर ते फक्त गायनावर. त्यांनी विविध संगीत मैफिलीतून संगीताला चालना दिली. त्यांनी केलेल्या संगीतसेवेमुळे भारतीय शास्त्रीय संगीतात पंडित भीमसेन जोशींचे स्थान अजरामर झाले आहे. महाराष्ट्र सरकार दरवर्षी भीमसेन जोशी यांच्या नावाचा भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्कार देते. आतापर्यंत हा पुरस्कार किशोरी आमोणकर, पंडित जसराज यांना मिळाला आहे. या महान गायकाचे २४ जानेवारी २०११ रोजी पुणे येथे वयाच्या ८८व्या वर्षी देहावसान झाले.

**-गोकुळ पवार**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# काळी मिरी जास्त खाल्ल्याने होऊ शकतात 'या' समस्या

काळी मिरी एक असा मसाला आहे ज्या वापर जवळपास सगळ्याच भारतीय किचनमध्ये होतो. याने पदार्थांची चव तर वाढतेच सोबतच आरोग्याला अनेक फायदेही होतात. अनेक लोक याचा आयुर्वेदिक औषधी म्हणूनही वापर करतात. याचा काढा प्यायल्याने इम्यूनिटी बूस्ट होते तसेच सर्दी, खोकलासारख्या समस्या दूर होतात, पण याचं जास्त सेवन करणं महागात पडू शकतं. चला जाणून घेऊ काय काय होतात नुकसान...



### श्वास घेण्यास समस्या

जर तुम्ही प्रमाणापेक्षा जास्त काळे मीऱ्याचं सेवन कराल तर तुम्हाला श्वास घेण्यास समस्या होऊ शकते, कारण हे रेस्पिरेट्री प्रॉब्लम्ससाठी जबाबदार आहे. याने ऑक्सिजनच्या फ्लोवर प्रभाव पडतो. त्यामुळे व्यक्ती व्यवस्थित श्वास घेऊ शकत नाही.

### स्कीन डिजीज

प्रत्येकाला वाटत असतं की, त्यांची त्वचा सुंदर आणि चमकदार दिसावी. यासाठी गरजेचं आहे की, त्वचेत ओलावा रहावा. काळी मिरी उष्ण असतात. त्यामुळे याने ओलावा शोषला जातो. या कारणाने त्वचेवर खाज, जळजळ आणि दाणे येतात.

### पोटात अल्सर

जे लोक जास्त प्रमाणात काळ्या मिरीचे सेवन करतात त्यांनी पोटासंबंधी समस्या होऊ शकते. यात पोटाचा अल्सरही होऊ शकतो. याच कारणाने तुम्ही याचं कमी प्रमाणात सेवन करावं. हवं तर याच्या सेवनासाठी तुम्ही डायटिशिअनचा सल्लाही घेऊ शकता.

### प्रेग्नेंसीमध्ये नुकसान

प्रेग्नेंट महिलांनी उष्ण असलेले पदार्थ खाऊ नये. काळी मिरी जास्त प्रमाणात खाल्ल्याने लॅक्टेशनची समस्या होऊ शकते. ज्यामुळे दूध पिणाऱ्या बाळांना नंतर समस्येचा सामना करावा लागू शकतो.

### शिंक येऊ शकते

काळी मिरी जास्त प्रमाणात खाल्ल्याने शिंका येऊ शकतात. ही फार गंभीर समस्या नाही, पण त्याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे, कारण काळ्या मिरीमध्ये असलेले पाइपरिन हे इरिटेन्ट म्हणून काम करते आणि त्यामुळे नेजाल म्युकस मेम्ब्रेनमध्ये जळजळ वाढते आणि शिंका येणे सुरू होतात.

# ‘स्पर्श’ कुष्ठरोग जनजागृती अभियान

## ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारीदरम्यान विविध जनजागृती उपक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

कुष्ठरोगाबाबत समाजातील गैरसमज दूर करून रुग्णांप्रति सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्याच्या उद्देशाने ‘स्पर्श’ कुष्ठरोग जनजागृती अभियान ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारीदरम्यान विविध उपक्रमांद्वारे राबविण्यात येणार आहे. ‘भेदभाव समाप्त करूया, सन्मानाची वागणूक देऊया’ हे यावर्षीच्या अभियानाचे घोषवाक्य आहे.

या अभियानांतर्गत जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने प्रभात फेरी, जनजागृती रॅली, शाळा व महाविद्यालयांमध्ये मार्गदर्शन सत्रे, पोस्टर व घोषवाक्य प्रदर्शन, आरोग्य शिबिरे, तसेच ग्रामसभा व सार्वजनिक ठिकाणी कुष्ठरोगाबाबत माहितीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. कुष्ठरोग हा पूर्णपणे बरा होणारा आजार असून वेळेवर निदान व उपचार केल्यास अपंगत्व टाळता येते, हा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. तसेच कुष्ठरोगग्रस्त व्यक्तीविषयी असलेला सामाजिक भेदभाव व कलंक दूर करून त्यांना सन्मानाने वागणूक देण्याचे आवाहन या अभियानाद्वारे करण्यात येणार आहे.

कुष्ठरोग हा मायक्रोबॅक्टेरियम लेप्रे नावाच्या जंतूमुळे होतो. कुष्ठरोगाची लक्षणे हळूहळू दिसून येतात. त्यामुळे ती वेळीच ओळखणे महत्त्वाचे आहे. कोणतेही लक्षण आढळल्यास तत्काळ जवळच्या आरोग्य केंद्रात तपासणी करून घ्यावी, मोफत उपचारांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी किसन जवळे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी व सहाय्यक संचालक कुष्ठरोग डॉ. प्राची नेहूलकर यांनी केले आहे. या अभियानामुळे समाजात जागरुकता वाढून कुष्ठरोग निर्मूलनास गती मिळेल, असा विश्वास आरोग्य विभागाने व्यक्त केला आहे. कुष्ठरोग पूर्णपणे बरा होणारा आजार आहे. सर्व शासकीय आरोग्य केंद्रात मोफत उपचार उपलब्ध आहेत.

त्वचेवर फिकट रंगाचे किंवा लालसर डाग दिसणे, त्या डागांवर स्पर्श, वेदना किंवा उष्णता जाणवत नाही. त्वचा कोरडी, कानाच्या पाळ्या जाड होणे, डागांवर घाम न येणे, हात, पाय किंवा चेह-यावर मुंग्या येणे, बधिरपणा, नसा जाड झाल्यासारख्या जाणवणे, हात-पायात कमकुवतपणा येणे, हाता-पायाची बोटे वाकडी होणे किंवा बधिर होणे, जखमा झाल्या तरी वेदना न होणे, डोळे पूर्ण नीट बंद न होणे, पापणी लुकलुकणे, चेह-यावर गाठी येणे (जुने, उपचार न घेतलेले रुग्ण), भुवया किंवा पापण्यांचे केस विरळ होणे.

## जंजिरा मुक्ती संग्राम दिन शासकीय पातळीवर साजरा करण्याची मागणी

**अलिबाग : प्रतिनिधी**



जंजिरा संस्थान भारतात विलीन झाल्याच्या ऐतिहासिक घटनेला स्मरणार्थ साजरा होणारा जंजिरा मुक्ती संग्रामदिन ३१ जानेवारी रोजी शासकीय पातळीवर साजरा करण्यात यावा, अशी मागणी रायगड प्रेस क्लब व मुरूड तालुका पत्रकार संघाने केली आहे. याबाबतचे सविस्तर निवेदन जिल्हाधिकारी रायगड यांना सादर करण्यात आले आहे.

३१ जानेवारी १९४८ रोजी जंजिरा संस्थान भारतात विलीन झाले होते. तत्कालीन जंजिरा संस्थानिक (नवाब) यांनी भारत सरकारसोबत इन्स्ट्रुमेंट ऑफ असोसिएशनवर स्वाक्षरी केल्यानंतर जंजिरा संस्थान स्वतंत्र भारताचा अविभाज्य भाग बनले. या ऐतिहासिक निर्णयामुळे जंजिरा संस्थानाची स्वतंत्र सत्ता समाप्त होऊन भारतीय संघराज्यात त्याचे अधिकृत विलिनीकरण झाले होते.

या पार्श्वभूमीवर, गेल्या पंधरा वर्षांपासून रायगड प्रेस क्लब व मुरूड तालुका पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने जंजिरा मुक्ती संग्राम दिन स्थानिक पातळीवर साजरा केला जात आहे. मात्र, मराठवाडा मुक्ती संग्राम दिन (दि. १७ सप्टेंबर) प्रमाणेच जंजिरा मुक्ती संग्राम दिनालाही शासकीय मान्यता देऊन शासन स्तरावर साजरा करण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यासंदर्भात अधिकृत नोंद असलेली रायगड गॅझेटियरची प्रतही प्रशासनाकडे सादर करण्यात आली आहे.

## मुंबई-नागपूर, मडगावदरम्यान चार विशेष रेल्वेसेवा चालवणार

**रोहा : प्रतिनिधी**

रेल्वे प्रवासाच्या वाढत्या मागणीचा विचार करता, मध्य रेल्वे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई  नागपूर व लोकमान्य टिळक टर्मिनस  मडगाव दरम्यान विशेष रेल्वे सेवा चालविण्यात येणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस  नागपूर व छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष (२ सेवा) गाडी क्रमांक ०२१३९ विशेष ही गाडी शनिवार, दिनांक २५.०१.२०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ००.२० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी १५.३० वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक ०२१४० विशेष ही गाडी शनिवार, दिनांक २५.०१.२०२६ रोजी नागपूर येथून २०.०० वाजता सुटेल आणि  छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी १३.३० वाजता पोहोचेल. या गाडीला दादर, ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मुर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा हे थांबे देण्यात आले आहेत.

लोकमान्य टिळक टर्मिनस - मडगाव - लोकमान्य टिळक टर्मिनस विशेष (२ सेवा) गाडी क्रमांक ०११२९ विशेष ही गाडी रविवार, दिनांक २५.०१.२०२६ रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून ०१.०० वाजता सुटेल आणि मडगाव येथे त्याच दिवशी १२.०० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०११३० विशेष ही गाडी रविवार, दिनांक २५.०१.२०२६ रोजी मडगाव येथून १४.३० वाजता सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी ०४.०५ वाजता पोहोचेया गाडीला ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ आणि सावंतवाडी रोड हे थांबे देण्यात आले आहेत.आरक्षणासाठी गाडी क्रमांक ०२१३९, ०२१४० आणि ०११२९ साठी आरक्षण दिनांक २३.०१.२०२६ पासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच खठउढउच्या संकेतस्थळावर (www.irctc.co.in) खुले होईल, असे प्रवासीवर्गाला कळविण्यात आले आहे.

## मतदार दिनानिमित्त नवमतदारांना शपथ

**मुरुड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुड-जंजिरा येथे तहसिलदार आदेश डफळ,  व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या आदेशाने निवडणूक शाखा मुरुड तहसील व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयाच्या परिसरात मतदार शपथ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. लोकशाही व्यवस्थेत मतदानाचे अनन्यसाधारण महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे व त्यांच्यामध्ये मतदार जागरूकता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. साजिद  शेख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसीलदारनिवडणूक शाखेचे  कल्याण देउलगावकर, यांनी विशेष उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी लोकशाही, संविधान व मतदानाच्या हक्कावर आधारित संदेशपर आपले विचार व्यक्त केले.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात प्राचार्य डॉ. साजिद  शेख यांनी मतदान हा केवळ हक्क नसून ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन केले. तरुण पिढीने निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, तसेच निर्भय व निष्पक्ष मतदान करून सक्षम लोकशाही घडविण्यास हातभार लावावा, असे आवाहन त्यांनी केले. नायब तहसीलदार कल्याण देउलगावकर यांनी मतदार नोंदणी प्रक्रिया, मतदार यादीतील नाव तपासण्याचे महत्त्व आणि मतदान प्रक्रियेतील शिस्त याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली.

यानंतर उपस्थित सर्व विद्यार्थी, शिक्षक व स्वयंसेवकांना मतदार शपथ देण्यात आली. देशाच्या लोकशाही परंपरेचे जतन करण्यासाठी मतदानाचा हक्क प्रामाणिकपणे बजावू अशी शपथ सर्वांनी घेतली. तसेच विविध मतदार जनजागृतीपर स्पर्धांचे आयोजन हि करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद  शेख यांच्या मार्गदर्शनाखाली एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. फिरोज शेख, सदस्य अल्ताफ फकीर यांनी आयोजन केले होते. तलाठी रोहन जाधव, मुरुड शहरातील बीएलओ भोईर सर, सुर्वे व गणेश चोडणेकर, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी तसेच एनएसएस स्वयंसेवक मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मतदानाविषयी जागरूकता वाढली असून लोकशाही मूल्ये, नागरिकत्वाची जाणीव व सामाजिक जबाबदारी अधिक दृढ झाल्याचे चित्र दिसून आले. महाविद्यालयाच्या अशा उपक्रमांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



## स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

**श्रीवर्धन : प्रतिनिधी , बातमीदार**

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त शिवसेना शहर संघटना, श्रीवर्धन यांच्या वतीने उपजिल्हा रुग्णालय, श्रीवर्धन येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर महाड येथील जनकल्याण रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने अत्यंत शिस्तबद्ध व यशस्वीरीत्या पार पडले.

या सामाजिक उपक्रमात शिवसैनिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. एकूण ४० रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून रक्तदान हेच श्रेष्ठ दान या विचाराला कृतीतून साकार केले. समाजासाठी सदैव कार्यरत राहणाऱ्या शिवसेनेची सामाजिक बांधिलकी या उपक्रमातून अधोरेखित झाली.

या रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी उपजिल्हा रुग्णालय, श्रीवर्धन येथील डॉ. कौस्तुभ केलस्कर, डॉ. ढवळे तसेच संपूर्ण रुग्णालय प्रशासन यांनी मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या सहकार्यामुळे शिबिर सुरळीत पार पडले.

या प्रसंगी नगराध्यक्ष अतुल चौगुले, शिवसेना शहर संघटक राजेश चव्हाण, नगरसेवक देवेंद्र भुसाणे, विरोधी पक्ष नेते संतोष वेश्वीकर, नगरसेविका सलोनी मोहित, युवासेना महिला आघाडी शहर अध्यक्षा सुप्रिया करदेकर, शिवसेना शहर अध्यक्ष अजय चव्हाण, अक्षय भाटकर यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

## शासकीय अध्यापक महाविद्यालयात शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शन



**माणगाव : बातमीदार**

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी शैक्षणिक साहित्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचा उद्देश भावी शिक्षकांमध्ये अध्यापन साहित्य निर्मितीची आवड निर्माण करणे तसेच अध्यापन अधिक प्रभावी व विद्यार्थी-केंद्रित बनविणे हा होता.

या प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयातील मान्यवर प्राचार्य डॉ.  रमा भोसले मॅडम व उपस्थित मान्यवर प्राध्यापक डॉ. कुसुम चौधरी मॅडम हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास प्राध्यापकवर्ग, प्रशिक्षणार्थी शिक्षक तसेच शिक्षण क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रदर्शनामध्ये गणित, विज्ञान, भाषा व सामाजिक शास्त्र विषयांशी संबंधित विविध शैक्षणिक साहित्य सादर करण्यात आले. चार्ट, तक्ते, मॉडेल्स, टीएलएम साहित्य तसेच कमी खर्चात व पुनर्वापरातून तयार केलेली अध्यापन साधने ही प्रदर्शनाची खास वैशिष्ट्ये ठरली. प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी प्रत्येक साहित्याची संकल्पना व त्याचा अध्यापनातील उपयोग प्रभावीपणे स्पष्ट केला.

या उपक्रमामुळे प्रशिक्षणार्थी शिक्षकांमध्ये सर्जनशीलता, आत्मविश्वास व अध्यापन कौशल्यांचा विकास झाला. उपस्थित मान्यवरांनी प्रदर्शनाचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे गुणवत्तापूर्ण शिक्षणाला चालना मिळते, असे मत व्यक्त केले.शैक्षणिक साहित्य प्रदर्शन अत्यंत यशस्वीपणे पार पडले.

## उत्कृष्ट समतादूत पुरस्काराने वैशाली खरपडे यांचा गौरव



**मुरुड : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी, पुणे.  मुख्यालय महाड येथे नुकतेच  दोन दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर राज्यस्तरीय कार्यशाळेत सन्माननीय मान्यवरांच्या हस्ते रायगड जिल्हातील उत्कृष्ट समतादूत पुरस्कार २०२६ या पुरस्काराने श्रीमती वैशाली अनिल खरपडे-पेरवे यांना सन्मानित करण्यात आले.

पुरस्कार महासंचालक सुनील वारे, निबंधक विशाल लोंढे, विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड, सुमेध थोरात, तेजस्विनी मॅडम, प्रकाश जमदाडे आणि संपूर्ण मुख्यालय टिमच्या हस्ते प्रदान करण्यात आला. समतादूत श्रीमती वैशाली खरपडे-पेरवे  यांनी बार्टी मुख्यालयाचे व रायगड समतादूतांचे आभार व्यक्त केले.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, माझे अशिल **श्री. धनजी गणेश बेरा,** राहणार ५०२, भगवती सोसायटी, सेक्टर-२३, खारघर-४१०२१०, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड, यांनी दिलेल्या माहितीवरून हि जाहीर नोटीस देत आहे की, माझ्या अशिलांच्या ताब्यातील दिनांक २८-०६-२००७ आणि २९-०६-२००७ रोजीचा अग्रीमेंट तू लिज (भाडेपट्टा करार) हरवले/गहाळ झाले आहे.

**हरवलेले/गहाळ झालेले कागदपत्र खालीलप्रमाणे:-**

**१) दिनांक २८-०६-२००७ रोजीचा नोंदणीकृत अग्रीमेंट तू लिज (भाडेपट्टा करार), मेसर्स. सिडको लिमिटेड आणि मोहम्मद युसुफ इब्राहीम पटेल यांच्या मध्ये सह दुय्यम निबंधक पनवेल ३ यांजकडे नोंदवण्यात आला आहे आला आहे ज्याचा नोंदणीकृत दस्तऐवज क्र. पवल३-०६९१०-२००७.**

**२) दिनांक २९-०६-२००७ रोजीचा नोंदणीकृत अग्रीमेंट तू लिज (भाडेपट्टा करार), मेसर्स. सिडको लिमिटेड आणि मोहम्मद युसुफ इब्राहीम पटेल यांच्या मध्ये सह दुय्यम निबंधक पनवेल ३ यांजकडे नोंदवण्यात आला आहे ज्याचा नोंदणीकृत दस्तऐवज क्र. पवल३-०६९२९-२००७.**

उपरोक्त गहाळ कागदपत्राबाबतची तक्रार दिनांक १६/०१/२०२६ रोजी खारघर पोलीस स्टेशन, खारघर, नवी मुंबई येथे दाखल करण्यात आली असून, सदर गहाळ कागदपत्राबाबतचे प्रमाणपत्र क्रमांक ००९०/२०२६ है खारघर पोलीस स्टेशन, खारघर, नवी मुंबई यांनी जारी केले आहे.

दिनांक २८-०६-२००७ आणि २९-०६-२००७ रोजी चे उपरोक्त मूळ अग्रीमेंट तू लिज (भाडेपट्टा करार) कोणासही आढळल्यास त्या व्यक्तीने ते माझ्या अशिलाकडे किंवा खालील नमूद वकिलांच्या पत्त्यावर परत करावेत.

कोणतीही व्यक्तीने अग्रीमेंट तू लिज (भाडेपट्टा करार) चा वापर चुकीच्या हेतूने/उद्देशाने करत असेल, तर ती पूर्णपणे त्याच्या/तिच्या/त्यांच्या जोखमीवर, खर्चावर आणि परिणामांवर करत असेल आणि माझे अशिल त्यासाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाहीत.

सर्व तमाम जनतेस आणि संस्थाच्या सर्व संबंधित सदस्यांना याद्वारे विनंती करण्यात येते की त्यांनी वरील बाबींची नोंद घ्यावी आणि उपरोक्त दस्तऐवज त्यांच्या निदर्शनास आणून दिल्यास पुढील कार्यवाहीसाठी कृपया खालील नमूद वकिलांना त्वरित कळवावे.

**दिनांक :-२३/०१/२०२६**

**सही/-**
**वकील श्री. आर. डी. तांबे**
**पत्ताः युनिट क्र.५, रहेजा आर्केड, पॉट नंबर-६१. सेक्टर-११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४,**


## रोहा लायन्स क्लबच्या सौजन्याने ज्येष्ठ नागरिकांना वॉकर स्टिकचे वाटप



**धाटाव :  प्रतिनिधी**

रोहा लायन्स क्लब यांच्या सौजन्याने रोह्यातील जेष्ठ, अपंग व गरजू नागरिकांना वॉकर स्टिकचे वाटप करण्यात आले. ज्येष्ठ नागरिक मंडळाचे सभासद अनंत गंगाधरे, सुभाष देसाई, उस्मान खान, सुनील साळवी, सुभाष दिघे, एकनाथ पाटील यांना रोहा-अष्टमी नगर परिषदेच्या नगराध्यक्षा कु. वनश्री शेडगे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

नोंदणी केलेले जे सभासद उपस्थित राहू शकले नाहीत, त्यांचे घरी जाऊन समक्ष स्टिक देण्यात येतील असे अध्यक्षांनी सांगितले. या समारंभास क्लबचे कार्यकारी लायन मिलन शहा व अब्बास रोहावाला तसेच जेष्ठ नागरिक मंडळ अध्यक्ष पी.बी. सरफळे, खजिनदार प्रकाश पाटील, ज्येष्ठ सदस्य शरद गुडेकर, अनंत पाटणकर, ज्येष्ठ पत्रकार अरुण करंबे आदी उपस्थित होते.

अपंग, गरजू जेष्ठ नागरिकांना रोहा लायन्स क्लबने वॉकस्टिक देऊन उपकृत केल्याबद्दल अध्यक्षांनी क्लबचे अध्यक्ष लायन लक्ष्मण शित्यालकर साहेब व त्यांचे सहकारी लायन यांचे आभार मानले. स्टिक्समुळे चालण्यास आधार मिळाला याचे समाधान वाटल्याची प्रतिक्रिया लाभार्थी सभासदांनी व्यक्त केली.

## सायकलस्वाराचा अपघातात मृत्यू

### ट्रकचाचालक फरार

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील टाकई आडोशी रस्त्यावर साजगाव येथे ट्रक चालकाने सायकलस्वरास मागून ठोकरल्याने सायकल स्वार अनंत हरी आंब्रे( ६२) यांचा गंभीर दुखापतीमुळे रुग्णालयात नेण्यापूर्वीच मृत्यू झाल्याची घटना शनिवारी सकाळी साडेसातच्या सुमारास घडली. अपघात झाल्यानंतर ट्रक चालक फरार झाल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे. या घटनेची खबर राजेश आंब्रे यांनी खोपोली पोलिसांना दिली. पोलिसांनी अज्ञात ट्रक चालका विरोधात गुन्हा दाखल केला असून पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार परदेशी पुढील तपास करीत आहेत.

## निजामपूर जि.प. उमेदवार राजीव साबळेंचा गाठीभेटींवर भर



**माणगाव : बातमीदार**

राजकारण म्हणजे केवळ व्यासपीठावरील भाषण नाही, तर तो माणसा माणसांमधील विश्वासाचा सेतू असतो. हेच पुन्हा एकदा सिद्ध करत आहेत निजामपूर जिल्हा परिषद मतदारसंघाचे उमेदवार ॲड. राजीव अशोक साबळे.संपूर्ण मतदारसंघात वैयक्तिक संपर्क साधत, प्रत्येक गावात जाऊन ग्रामस्थांच्या गाठीभेटी घेत, त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होत ते प्रचार दौरा करत आहेत. हातात माईक नाही, तर मनात माणुसकी आहे आणि म्हणूनच त्यांच्या भेटी औपचारिक न राहता आपुलकीच्या, हृदयस्पर्शी ठरत आहेत.

मतभेद, पक्षभेद, गटतट विसरून कामासाठी एकत्र येऊया ही त्यांची भूमिका अनेकांना भावते आहे. त्यामुळेच सर्व स्तरातून त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद आणि भक्कम पाठिंबा मिळत आहे. उच्च शिक्षित, तरुण आणि दूरदृष्टी असलेला उमेदवार म्हणून मतदारांकडून त्यांच्याकडून अनेक विकासकामांच्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत.


### सुचना
### रा.स्व.संघ जनकल्याण समिती
### डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालय, पनवेल

या संस्थेचे एप्रिल २०१८ ते मार्च २०२० या वर्षाचे IPD, OPD व Dialysis या विभागाचे रेकॉर्ड सरकारी नियमाप्रमाणे नष्ट करण्यात येणार आहे. तरी या संबंधित वर्षातील माहिती कोणास हवी असल्यास जाहिरात तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत रुग्णालयाशी संपर्क करावा. त्या नंतर सदर वर्षाची माहिती देण्यास रुग्णालय जबाबदार राहणार नाही.

**सही/-**
**डॉ. भक्ती सारंग**
**वैद्यकिय अधिक्षक**

रा.स्व.संघ जनकल्याण समिती डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालय, पनवेल १९६/१, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, पनवेल ४१०२०६. मोबाईल क्र. ९३२१६३६४९७

# मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यात विविध कार्यक्रमांतून नवी मुंबईत मराठीचा जागर

## 'आंग्रु डुंग्रू'तून उजळला आगरी बोलीभाषेचा गोडवा

**नवी मुंबई : बातमीदार**

देशात ३ हजाराहून अधिक बोलीभाषा असून बोलीभाषांना इथल्या मातीचा गंध असतो, त्यामुळे बोलीभाषांच्या पायावरच प्रमाण भाषेची इमारत उभी असते असे मत व्यक्त करीत लेखक श्री.गजआनन म्हात्रे यांनी आपल्या सहका-यांसह 'आंग्रु डुंग्रू' या कार्यक्रमातून विविध उदाहरणे देत, लघुकथा, कविता, धवलेगीत सादर करीत आगरी भाषेतील सौंदर्यस्थळांचे नितांतसुंदर दर्शन घडविले. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली २८ डिसेंबरपर्यंत वैविध्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून आगरी बोलीभाषेचे महत्व सांगणा-या 'आंग्रु डुंग्रू' या कार्यक्रमाला उपस्थितीतांची चांगली दाद मिळाली.

नवी मुंबईची ओळख ही आगरी-कोळ्यांची भूमी आहे. त्यामुळे इथली मूळ बोलीभाषा असणा-या आगरी भाषेतील गोडवा व तिचा इतिहास आणि परंपरेची ओळख व्हावी यादृष्टीने 'आंग्रु डुंग्रू' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आगरी भाषेत विपुल लेखन करणारे साहित्यिक श्री.गजआनन म्हात्रे यांच्यासह गायिका श्रीम.संगीता पाटील व कवी श्री.अजय भोईर यांनी कविता, गीत, लघुकथा सादरीकरणातून आगरी साहित्याची नजाकत पेश केली.



अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त नामवंत गज़लकार डॉ.कैलास गायकवाड यांनी प्रत्येक भाषेची स्वत:ची अशी सौंदर्यस्थळे असतात असे सांगत आगरी बोलीभाषेचे महत्व विशद केले. याप्रसंगी मुख्य विधी अधिकारी श्री.अभय जाधव, कार्यकारी अभियंता श्री.प्रवीण गाडे व श्री. तानाजी शिंदे, सहा.आयुक्त श्री.अरूण पाटील आणि अधिकारी, कर्मचारी व नागरिकांची रसिक उपस्थिती होती.

पंधरवड्यातील पुढील कार्यक्रम शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६ रोजी, सकाळी ११ वा. असून महाराष्ट्र राज्य भाषा सल्लागार आणि शासनाच्या लोकराज्य मासिकाचे माजी संपादक, लेखक तथा माहिती जनसंपर्क महासंचालनालयाचे निवृत्त संचालक सुरेश वांदिले यांचे 'कार्यालयीन मराठी लेखन आणि मराठी युवकांसाठी करिअरच्या संधी' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आलेले आहे.

मंगळवार, दि. २७ जानेवारी २०२६ रोजी, सकाळी ११ वा., कोल्हापूर जिल्ह्यात 'वाचनकट्टा' ही अभिनव संकल्पना शाळा-महाविद्यालयांत राबवून नव्या पिढीत वाचन प्रेरणा निर्माण करणारे 'वाचनकट्टा' या अभिनव संकल्पनेचे संस्थापक श्री.युवराज कदम यांचा शिक्षक, पालक, विद्यार्थी, साहित्यप्रेमी नागरिक यांच्याशी प्रेरणादायी संवाद - 'वाचाल तर वाचाल' संपन्न होणार आहे. या माध्यमातून विशेषत्वाने नवी मुंबईतील शाळा - महाविद्यालयांत वाचनसंस्कृती वाढीसाठीच्या प्रयत्नांना दिशा देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६ रोजी, सकाळी ११ वा., गज़लसम्राट सुरेश भट यांचा वारसा जपत मराठी गज़लचे दालन समृध्द करणारे सुप्रसिध्द गज़लकार श्री. आप्पा ठाकूर यांचा 'गुंतलेले पाश' हा मराठी गज़लांचा हृदयस्पर्शी कार्यक्रम संपन्न होणार आहे.

त्याच दिवशी २८ जानेवारी रोजी, सायं. ४ वा. नमुंमपा अधिकारी/कर्मचारी यांचेकरिता 'मला आवडलेले मराठी पुस्तक' या विषयावर 'मनोगत स्पर्धा' आयोजित करण्यात आलेली आहे. पुस्तक वाचनाने माणसाचे व्यक्तिमत्व घडत असते, त्याला आकार येत असतो. अशी जगणे समृध्द करणारी पुस्तके इतरांनीही वाचावीत असे आपल्याला वाटत असते. त्या अनुषंगाने नमुंमपा अधिकारी, कर्मचारी यांनी आपल्याला आवडलेल्या पुस्तकाविषयी ५ मिनिटांच्या कालावधीत मनोगत व्यक्त करणे अपेक्षित असून ज्यामुळे ते पुस्तक मिळवून पूर्ण वाचण्याची उत्सुकता श्रोत्यांच्या मनात उत्पन्न होईल.

त्यानंतर नमुंमपा अधिकारी, कर्मचारी व साहित्यप्रेमी नागरिक यांच्याकरिता 'शब्दकोडे स्पर्धा' आयोजित करण्यात येत आहे. यामध्ये उपस्थितांना उभे-आडवे चौकोन असणारे मराठी शब्दकोडे देण्यात येईल. ते सर्वात जलद सोडविणा-या पहिल्या १० विजेत्या स्पर्धकांना स्पर्धेनंतर लगेच पारितोषिके प्रदान करण्यात येतील.

# प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहिमेत ७५ हजारांची दंडवसुली

## ४४.५ किलो प्लास्टिक पिशव्या जप्त

**नवी मुंबई : बातमीदार**

शहर प्लास्टिकमुक्त करण्यासाठी नागरिक सहभागाकरिता सातत्याने जनजागृती करण्यात येत असून त्यासोबतच प्लास्टिक प्रतिबंधात्मक तपासणी व दंडात्मक कारवाई मोहीमा सर्वत्र राबविण्यात येत आहेत. याबाबत केंद्रीय व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून सूचना करण्यात आल्या असून त्यानुसार एकल वापर प्लास्टिक बंदीच्या अनुषंगाने विशेष मोहीमा राबविण्यात येत आहेत.



त्यानुसार २२ जानेवारी २०२६ रोजी सर्व विभाग कार्यालय क्षेत्रात विशेषत्वाने फेरीवाले, मार्केट, दुकाने या ठिकाणी प्लास्टिक पिशव्या व एकल वापर प्लास्टिक तपासणी मोहीम प्रभावी रितीने राबविण्यात आली. महापालिका आयुक्त यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली ही मोहीम राबविण्यात आली असून यामध्ये ५ व्यावसायिकांकडून रू.२५ हजार दंडात्मक रक्कम वसूली आणि ७ कि.ग्रॅ. प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आलेला आहे. यामध्ये, तुर्भे विभागातील कारवाईत ५ हजार दंडात्मक रक्कम वसूली आणि २ कि.ग्रॅ. प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त केला



**उलवे : सेक्टर १६ येथील हनुमान मंदिर मैदानावर उन्नती वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने सरस्वती पूजन अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहात झाले. या कार्यक्रमास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख उपस्थित होते. त्यांच्यासोबत निलेश खारकर, निकिता खारकर, वितेश म्हात्रे आणि उज्वल वेल्फेअरचे संस्थापक देवालय मित्रा यांची उपस्थिती लाभली.**

# अपहृत अल्पवयीन मूकबधीर मुलगा सापडला

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आपटा रेल्वे स्टेशनजवळ खेळत असताना निघून गेला म्हणून रसायनी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. सदर मुलाचा शोध घेण्यासाठी बऱ्याच सीसीटीव्ही फूटेजची पाहणी केली.त्यामध्ये



तो आपटा रेल्वे स्टेशन वरून ट्रेनने रोहा येथे गेल्याचे दिसत होते व तेथून मंगला एक्सप्रेस (Up train) यामध्ये बसल्याचे दिसेन आले, परंतु पनवेल, कल्याण, कसारा, भुसावळ येथे ट्रेनमधून खाली उतरताना दिसत नव्हता. त्यामुळे मंगला एक्सप्रेस रूटवरील सर्व स्टेशन मास्तरचा ग्रुप तयार करून व वेगवेगळ्या स्टेशन वर त्याची शोधपत्रिका डकवून त्या माध्यमातून गोंदिया येथून सदर मुलास आरपीएफने निरीक्षण गृहात ठेवले असल्याचे समजले. त्या मुलास पोलीस टीमने त्याचे आईवडिलांसाह गोंदिया येथे ताब्यात घेतले आहे.

# सीकेटी विद्यालयात देशाच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त विशेष कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालय येथे आपल्या भारत देशाच्या ७७व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी सिद्धार्थ मनोहर साळवी माजी विद्यार्थी व डॉ. अस्मिता जगदीश घरात नवनिर्वाचित नगरसेविका पनवेल महानगरपालिका हे



उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी ईशस्तवनाने कार्यक्रमाची सुरुवात केली.

मुख्याध्यापक सुभाष मानकर यांनी प्रमुख अतिथींचे स्वागत शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन केले. या कार्यक्रमासाठी नीलिमा शिंदे, मुख्याध्यापिका इंग्रजी प्राथमिक विभाग, वैशाली पारधी मॅडम पर्यवेक्षिका इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग यांचे देखील पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने 'लोकनेते मा.श्री. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त' घेण्यात आलेल्या देशभक्तीपर गीत गायन स्पर्धेचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या शुभहस्ते देऊन विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर केली.

कार्यक्रमाच्या शेवटी सहाय्यक शिक्षक श्री. पंढरीनाथ जाधव सर यांनी मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.

# किराणा दुकान फोडणारा चोरटा पोलिसांच्या जाळ्यात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा अतिरीक्त एमआयडीसी परिसरातील चावंढोली गावात अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या वेळेस किराणा दुकान फोडल्याची घटना घडली. चांवढोली येथील श्रीराम किराणा सुपर मार्केटच्या छतावरील सिमेंटचा पत्रा तोडून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश केला. दुकानातील रोख रक्कम व इतर मुद्देमाल असा एकूण ३१ हजार ७०० रुपयांचा माल चोरून नेण्यात आला.

सकाळी दुकान उघडण्यास आल्यावर दुकान मालक रमेशकुमार सिर्वेही याने रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यावेळी रसायनी पोलिसांनी तात्काळ तपास चक्र फिरवत सीसीटीव्हीच्या माध्यमातून अखिलेशकुमार परदेशी राम (वय २४) व त्याचा साथीदार यांना ताब्यात घेतले व अटक केली आहे. त्यांच्याकडून दुकानात असणारा ३१ हजार ७०० रूपयाचा माल ताब्यात घेतला आहे.



# श्री शिवप्रतिष्ठानच्या माध्यमातून धारातीर्थ गडकोट मोहीम

## संभाजी भिडे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली धारकरी मार्गस्थ

**पनवेल : दादाराम मिसाळ**

श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या माध्यमातून प्रतिवर्षी धारातीर्थ गडकोट मोहिमेचे आयोजन केले जाते. शिवछत्रपती धर्मवीर शंभूछत्रपती यांच्या विचारांचा यांच्या रक्त गटाचा अवघा हिंदू समाज व्हावा यासाठी मागील ४० वर्षापासून संभाजी भिडे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम चालू आहे

३५० वर्षापूर्वी आपल्या मावळ्यांनी कशा पद्धतीने मोहिमा केल्या असतील, ते कुठे झोपले असतील, त्यांनी कोणत्या झऱ्याचे पाणी प्यायले असेल याची अनुभूती घेण्यासाठी महाराष्ट्रासह संपूर्ण हिंदुस्थानातून लाखो धारकरी या धारातीर्थ गडकोट मोहीमेत सहभागी होत असतात

या वर्षीची धारातीर्थ गडकोट मोहीम ही लोहगड ते भिवगड (भिमगड)मार्गे आई एकविरा देवी व राजमाची गड येथे २३ जानेवारी ते २६ जानेवारी अशी होणार आहे २६ जानेवारी रोजी भिवगडाच्या पायथ्याशी या मोहिमेची सांगता होणार आहे

पनवेल तालुक्यामधून दरवर्षी ५००-६०० धारकरी या मोहिमेत सहभागी होत असतात २३ जानेवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचे आशीर्वाद घेऊन धारकरी गडकोट मोहिमेसाठी मार्गस्थ झाले. त्यांच्यामध्ये या वेळी उत्साह दिसून आला.

# बोरीपाखाडी येथे शेतकऱ्यांसाठी बायोचार निर्मिती प्रशिक्षण

**उरण : वार्ताहर**

जमिनीचा पोत सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे आवाहन कृषि विभागाने शेतकऱ्यांना केले. शेतकऱ्यांनी शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जमिनीची सुपीकता टिकवून ठेवावी, या उद्देशाने बोरीपाखाडी या गावामध्ये शेतकऱ्यांसाठी 'बायोचार' (Biochar) निर्मिती आणि वापराबाबत विशेष प्रशिक्षण मंगळवार ( दि.२० ) रोजी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रशिक्षणातून शेतकऱ्यांना टाकाऊ कचऱ्यापासून उपयुक्त खत कसे तयार करावे, याचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



या कार्यक्रमाला कृषी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये आर. टी. नारनवर (तालुका कृषी अधिकारी),एस डी गतकळ (मंडळ कृषी अधिकारी) ए.डी.बुरकुल (उप कृषी अधिकारी) नैसर्गिक शेती मिशनचे उपाध्यक्ष हेमंत पाटील, सचिव रवींद्र काठे, प्रगतशील शेतकरी कमलाकर थळी, उपस्थित होते. सहाय्यक कृषी अधिकारी ए. आर. राठोड , श्री आर.पी.भजनावळे, ए. एस पानसरे यांनी बायोचार बाबत शेतकऱ्यांना माहिती देऊन मार्गदर्शन केले. बायोचार म्हणजे काय याची माहिती दिली.

पीक कापणीनंतर उरलेला कचरा न जाळता, त्यापासून शास्त्रीय पद्धतीने बायोचार तयार केल्यास जमिनीला कर्ब मिळतो आणि पाण्याची धारण क्षमता वाढते.

# ॲड. पी.एल. गायकवाड यांना डॉक्टरेट पदवी प्रदान

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल येथील सामाजिक कार्यकर्ते महात्मा फुले छत्रपती शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्याचे अभ्यासक, माजी प्राचार्य पी. एल गायकवाड यांना भारत मंच ट्रस्ट, संविधान हॉल, दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात सिक्कीम राज्याचे माजी राज्यपाल वाल्मीकी प्रसाद सिंग यांच्या हस्ते अमेरिका इंटरनॅशनल युनिर्व्हसिटीच्या वतीने सामाजिक कार्याबददल डॉक्टरेट ही पदवी प्रदान करण्यात आली.



या समारंभास नॅशनल युथ अवार्डी डॉ. मनीष गवई, पद्मश्री बी.आर. इदाते, सुरेखा लामतुरे आदी मान्यवर कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

पी.एल. गायकवाड हे सुधागड एज्युकेशन सोसायटीचे ज्ञानवर्धिनी माध्यमिक विदयालय सावळे (ता. पनवेल) येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. ते सध्या सेवानिवृत झाले आहेत. शाळा सांभाळत त्यांनी अनेक सेवाभावी संस्था व पदाधिकारी म्हणून काम पाहिले. यापुर्वी पी. एल. गायकवाड यांना राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावरील अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. शैक्षणिक क्षेत्र याच्यातून सामाजिक व धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय समाजसेवा केलेली आहे. मराठवाडा विद्यापीठ नामांतर अंदोलनामध्ये लाँग मार्चमध्ये सहभाग व अग्रेसर होते.

# आत्महत्येच्या उंबरठ्यावर असलेल्यांना राजाराम जोशी यांचा आधार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाशी खाडी परिसरात आत्महत्येच्या विचारांनी ग्रासलेल्या अनेक व्यक्तींना नवसंजीवनी देण्याचे कार्य एका सामान्य नागरिकाने आपल्या धैर्याने आणि माणुसकीने केले आहे. नवी मुंबई वाशी गावातील रहिवासी राजाराम जोशी हे गेल्या काही वर्षांपासून जीव धोक्यात घालून संकटात सापडलेल्या व्यक्तींना वाचवत आहेत.



वाशी खाडी ही अनेकांसाठी आत्महत्येचे ठिकाण ठरत असताना, तिथे उडी मारण्याच्या तयारीत असलेल्या व्यक्तींशी संवाद साधून, त्यांचे समुपदेशन करून त्यांना त्या टोकाच्या निर्णयापासून परावृत्त करण्याचे काम जोशी करत आहेत. आर्थिक अडचणी, कौटुंबिक तणाव, व्यसनाधीनता, मानसिक अस्वस्थता यामुळे अनेक जण हतबल होतात. अशा वेळी जोशी हे त्यांच्यासाठी आशेचा किरण ठरतात.

आजवर त्यांनी ५० हून अधिक व्यक्तींचे प्राण वाचवले असून, अनेक वेळा पोलिस व अग्निशमन दलाच्या मदतीनेही ही कामगिरी पार पाडली आहे. मात्र, ही जबाबदारी त्यांनी कोणत्याही मोबदल्याच्या अपेक्षेशिवाय स्वीकारली आहे. समोरचा माणूस वाचला, हेच माझे बक्षीस आहे, असे ते सांगतात. कठीण प्रसंगी स्वतःचा जीव धोक्यात घालून दुसऱ्याचा जीव वाचवणाऱ्या राजाराम जोशी यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी असले, तरी आजवर त्यांना कोणत्याही शासकीय किंवा सामाजिक पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले नाही, ही बाब खेदजनक आहे. आत्महत्या हा उपाय नाही, तर प्रत्येक समस्येवर मार्ग असतो, हा विश्वास निर्माण करण्याचे काम जोशी सातत्याने करत आहेत.

# खोपोली पालिकेचा धूळमुक्तीसाठी पुढाकार

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहराला धूळमुक्त करण्यासाठी आणि नागरिकांचे आरोग्य जपण्यासाठी येथील नगर परिषदेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. तांत्रिक कारणास्तव गेल्या काही काळापासून बंद अवस्थेत असलेले धूळ प्रदूषण नियंत्रण वाहन नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे आणि उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांच्या प्रयत्नांमुळे पुन्हा कार्यान्वित करण्यात आले आहे.



प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून येत्या २६ जानेवारीपर्यंत शहरातील सर्व मुख्य रस्ते, गल्लीबोळ आणि अंतर्गत रस्ते या वाहनामार्फत पूर्णपणे स्वच्छ करण्यात यावेत, असे सक्त आदेश प्रशासनामार्फत देण्यात आले आहेत. शहराच्या सौंदर्यीकरणासोबतच वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

हे वाहन धूळ खात पडून असल्याने शहरात धुळीचे साम्राज्य वाढले होते. याची दखल घेत नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्ष यांनी संबंधित विभागाचा पाठपुरावा करीत गाडीची दुरुस्ती करून घेतली. आता हे वाहन दररोज नियोजित वेळापत्रकानुसार शहरातील विविध भागांत फिरून रस्ते सफाईचे काम करणार आहे.

नगर परिषदेच्या या निर्णयामुळे शहरातील धुळीचा त्रास कमी होणार असून आरोग्याच्या तक्रारीही कमी होतील, अशी आशा नागरिकांनी व्यक्त केली आहे. २६ जानेवारीपर्यंत शहर स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त करण्याच्या या मोहिमेचे सर्व स्तरांतून नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष यांचे कौतुक होत आहे.

# हवामान बदलामुळे शेतकऱ्याचे नुकसान

**धाटाव : प्रतिनिधी**


रोहा तालुक्यातील तळाघर गावचे युवा शेतकरी रामजी बाळू माने यांनी कष्टाने फुलवलेली धाटाव हद्दीतील कलिंगडाची शेती अवकाळी वातावरणातील बिघाड व रोगराईमुळे उद्ध्वस्त झाली आहे.

सुमारे तीन हेक्टर क्षेत्रावरील कलिंगड पीक काही प्रमाणात तयार झाले असतानाच अचानक आलेल्या हवामान बदलामुळे व रोगाच्या प्रादुर्भावाने हातचे गेले असून त्यामुळे शेतकऱ्याच्या मेहनतीसह लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून कलिंगड शेतीतून सातत्याने चांगले उत्पादन घेणाऱ्या रामजी माने यांनी या वर्षी मोठ्या अपेक्षेने 'गोल्डन' वाणाच्या कलिंगडाची लागवड केली होती. पिकाची वाढ चांगली होत होती, कलिंगडेही आकार घेत होती, मात्र ऐन उत्पादनाच्या काळातच वातावरणात अचानक बदल झाला. दमट हवामान व रोगराई यामुळे काही दिवसांतच मर रोगाचा प्रादुर्भाव वाढला आणि उभे पीक डोळ्यांसमोर नष्ट झाले.

या शेतीसाठी माने यांनी नांगरणी, मशागत, ड्रिप लाईन बसवणे, रोपे लागवड, मजुरी, फवारणी, खते व अवजारे यासाठी मोठी आर्थिक गुंतवणूक केली होती. पीक वाया गेल्याने शेतकरी हताश झाला आहे.

# माथेरानमध्ये महिलांसाठी आरोग्य शिबिर



**माथेरान : प्रतिनिधी**

हार्मनी फाउंडेशनचे संचालक नितीन कांदळगावकर, नम्रता कांदळगावकर आणि सुभाष भोसले यांच्या माध्यमातून माथेरानमधील महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

हार्मनी फाउंडेशनचे हे १६१ मोफत स्त्रीरोग तपासणी शिबिर होते. गोल्ड मेडलिस्ट प्रसूती आणि स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. रोजीना काझी यांनी महिलांची सखोल तपासणी केली. यामध्ये प्रामुख्याने गर्भधारणा, मासिक पाळीविषयी तक्रारी, गर्भाशयाच्या संबंधित आजार अशा विविध तपासण्या करण्यात आल्या तसेच किशोरवयीन मुलींसाठी आरोग्य सल्ला आणि महिलांचे वार्षिक हेल्थ चेकअपसंबंधी मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी माथेरानमधील बहुसंख्य महिलांनी या मोफत स्त्रीरोग तपासणी शिबिराचा लाभ घेतला. यात काही वयोवृद्ध महिलादेखील उपस्थित होत्या.

हार्मनी फाउंडेशनचे संचालक तथा भाजप माथेरान शहर उपाध्यक्ष सुभाष भोसले यांनी मागील शिबिरात सांगितल्याप्रमाणे माथेरानमधील प्रत्येक विभागात फाउंडेशनच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्फत महिलांची आरोग्य तपासणी केली जाणार आहे. आता पुढील महिन्यात माथेरानमधील दुसऱ्या विभागात असे शिबिर घेतले जाणार आहे.

शिबिरावेळी नगरसेविका प्रतिभा घावरे, रिजवाना शेख तसेच भाजपच्या आजी माजी महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

# एक्सप्रेस वेवर चालकाला लुटले

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावर एका ट्रकचालकाला चार चोरट्यांनी मारहाण करत रोख रक्कम, मोबाईल असा एकूण २९ हजार ५०० रुपये किमतीचा माल चोरुन नेल्याची घटना पहाटेच्या सुमारास घडली.

एक्सप्रेस वेवर पुणे बाजूकडून ट्रकचालक त्याच्या ताब्यातील ट्रक (एमएच ०९ एफएल ८३६१) मुंबई ते पुणे घेऊन चालला होता. फुडमॉलजवळ रस्त्याला चढण असल्याने गाडी कमी वेगाने चालवित पुढे चालला असता चार चोरट्यांनी ट्रकचालकाला खाली ओढून ठार मारण्याची धमकी दिली तसेच त्याला मारहाण करत त्याच्याजवळील रोख रक्कम, मोबाईल चोरी करून नेला. याबाबत खोपोली पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

# 'सोशल मीडियाचा सुयोग्य वापर करावा'

**चौक : प्रतिनिधी**

सोशल मीडियाचे अनेक वाईट परिणामही आहेत. मानसिक आरोग्यावर ताण, अभ्यासात लक्ष न लागणे, झोप कमी होणे आणि ऑनलाइन दादागिरी यामुळे वास्तविक जीवनातील संबंधांवरही नकारात्मक परिणाम होतो तसेच गोपनीयतेचा धोका वाढून वाईट प्रसंगाला सामोरे जावे लागते. त्याने एखाद्याचे आयुष बरबाद होते. म्हणूनच सोशल मीडियाचा वापर चांगल्या माहितीसाठी आणि कामासाठी करावा, असे आवाहन खालापूर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी केले.

सध्या सोशल मीडियामुळे तक्रारींमध्ये वाढ झाली. धार्मिक भावना दुखावणे, एखाद्याला मानहानीकारक संबोधणे, खोटे अकाऊंट ओपन करून बदनामी करणे असे गुन्हे वाढले आहेत. अशातच जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या निवडणुका लागल्या असल्याने पोलीस निरीक्षक पवार यांनी व्हॉट्सअॅप ग्रुप, इस्टाग्राम,



फेसबुक अॅडमिन आणि पोलीस पाटील यांची बैठक आयोजित केली. त्या वेळी ते बोलत होते.

ऑनलाइन जास्त वेळ घालवल्याने प्रत्यक्ष सामाजिक संबंध कमी होतात आणि एकाकीपणाची भावना निर्माण होते. ऑनलाइन नकारात्मक टिप्पण्या किंवा लाइक्स न मिळाल्यास आत्मसन्मान कमी होऊ शकतो. यामुळे आपले वर्तन आणि जीवनशैलीतील बदल होतो. सोशल मीडियावर जास्त गुंतल्याने वास्तविक जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष होते, त्यामुळे सुरक्षा आणि सामाजिक धोके निर्माण होतात. चुकीची किंवा भडकाऊ माहिती पसरते, ज्यामुळे समाजात गैरसमज निर्माण होतात. तसे होऊ नये यासाठी सोशल मीडियाचा वापर मर्यादित ठेवा, असे आवाहन करण्यात आले.

पोस्ट करण्यापूर्वी विचार करा आणि माहितीची सत्यता तपासा. सकारात्मक आणि योग्य गोष्टींसाठी सोशल मीडियाचा वापर करा, असे सांगून सोशल मीडिया चांगल्या पद्धतीने वापरा, असे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ विशाल नेहुल यांनी सूचित केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सपोनि संतोष औटी यांनी केले. या वेळी पत्रकार अर्जुन कदम, गाव पोलीस पाटील, ग्रुप अॅडमिन यांनी आपले विचार व्यक्त केले.

# महडमध्ये माघी जन्मोत्सव; भाविकांची गर्दी





**खोपोली : प्रतिनिधी**

अष्टविनायकापैकी एक गणपती असलेल्या महड येथील वरदविनायकाचा जन्मोत्सव गुरुवारी मोठ्या भक्तिभावाने साजरा झाला. सकाळपासून भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

सकाळी आठ वाजता आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते गणपतीची महापूजा झाली. विविध भागातून भाविक गणेश जन्मासाठी महडमध्ये आले होते. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्त गोविंद आफळे यांनी गणेश जन्माचे कीर्तन सादर करत भाविकांना मंत्रमुग्ध केले. दुपारी १२ वाजून ३९ मिनिटांनी जन्मोत्सव साजरा झाला. या वेळी श्री गणपती संस्थानच्या कार्याध्यक्ष मोहिनी वैद्य यांच्या हस्ते पूजा झाली.

भाविकांसाठी महड फाटा येथून मंदिरापर्यंत मोफत रिक्षाची सोय करण्यात आली होती. याशिवाय रुग्णवाहिका, महाप्रसादाची सोय देवस्थान संस्थानतर्फे होती. भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी अतिरिक्त सुरक्षारक्षक, पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# डॉ. चिंतामणराव देशमुख वक्तृत्व स्पर्धा

**रोहा : प्रतिनिधी**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या रोह्यातील डॉ. चिंतामणराव देशमुख वाणिज्य व सौ.कुसुमताई ताम्हणे कला महाविद्यालयात डॉ. चिंतामणराव देशमुख राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा संस्थेचे चेअरमन अॅड. सिद्धार्थ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. ५३ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा.सुरेंद्र दातार यांच्या हस्ते आणि महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख प्रा. तुळशिदास मोकल यांच्या अध्यक्षतेखाली झाले.



स्पर्धेत स्पर्धकांनी सोशल मीडिया संवाद की विलगीकरण, राजकारणातील उत्तुंग व्यक्तिमत्व– लोकनेते अॅड. दत्ता पाटील, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आणि भारताची कृषिप्रधानता, भारतीय संस्कृती काल, आज आणि उद्या, संतानी महाराष्ट्राला दिलेली जीवनमूल्ये, वसुधैव कुटुंबकम : भारत महासत्ता होण्याचे निकष या विषयावर आपल्या वक्तृत्वाच्या माध्यमातून आपले विचार प्रकट केले.

स्पर्धेच्या वरिष्ठ गटातील प्रथम क्रमांक स्मृतिचिन्ह व ५००१ रुपये श्रवण कदम या विद्यार्थ्यांनी पटकावला. द्वितीय क्रमांक स्मृतिचिन्ह व ४००१ रुपये वेदांत कंटक, तृतीय क्रमांक स्मृतिचिन्ह व ३००१ रुपये अथर्वी चव्हाण व पंकज पंडुळे यांनी, तर दोन उत्तेजनार्थ बक्षिसे स्मृतिचिन्ह व १५०१ रुपये रिया राणे व केतन गुप्ता या स्पर्धकांनी मिळविले.

कनिष्ठ गटाचा प्रथम क्रमांक स्मृतिचिन्ह व २००१ रुपये अथर्वी चव्हाण, द्वितीय क्रमांक स्मृतिचिन्ह व १५०१ रुपये नील पिंपळे, तृतीय क्रमांक स्मृतिचिन्ह व १००१ रुपये रुचिता मांडलेकर यांनी प्राप्त केला.

डॉ.चिंतामणराव देशमुख राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या कनिष्ठ गटाचा फिरता चषक कोकण एज्युकेशन सोसायटीच्या मेहेंदळे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या संघाने जिंकला, तर स्पर्धेच्या वरिष्ठ गटाचा फिरता चषक जेएसएम अलिबाग या महाविद्यालयाने जिंकला. सर्व विजेत्या आणि सहभागी स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते सहभाग प्रमाणपत्र व पदक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. सुरेंद्र दातार, भरत चौधरी, ज्योती पोवळे, सीमा भोसले यांनी काम पाहिले.

# नांदगावच्या सिद्धिविनायक मंदिरात भाविकांची मांदियाळी

**मुरुड : प्रतिनिधी**

माघ शुद्ध विनायकी चतुर्थीनिमित्त मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील चिटणीस उर्फ गुप्ते कौटुंबिक ट्रस्ट आणि सेवा मंडळाच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे मंदिरात माघी गणेशोत्सवात श्री सिद्धिविनायकाच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी उसळली होती.

सालकर जोशी ट्रस्टतर्फे गुरुजी शैलेश जोशी, सेवा मंडळाच्या दैनंदिन पूजाविधीचे गुरुजी महेश जोशी, विनायक जोशी, अभिषेक जोशी, अनिह जोशी आदींनी पहाटे दोन वाजता श्री सिद्धिविनायकाची षोडशोपचारे पूजा केली. त्यानंतर चिटणीस गुप्ते कौटुंबिक ट्रस्टच्या वतीने तसेच सेवा मंडळाच्या वतीने सदस्य पल्लवी ठाकूर यांनी श्रींची पूजा केली. मग मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात





आले. यावेळी दर्शनासाठी भाविकांनी मंदिरात रांगा लावल्या. त्यात येथील यशवंतनगर पंचक्रोशीसह मुरुड तालुक्यातील व अन्य ठिकाणाहून आलेल्या भाविकांचा समावेश होता.

माघ शुद्ध प्रतिपदेपासून मंदिरात पुणे येथील कीर्तनकार हभप श्रेयस बडवे यांच्या सुश्राव्य कीर्तनाने माघी गणेशोत्सवाला सुरुवात करण्यात आली होती. चतुर्थीच्या दिवशी सकाळी अकरा वाजल्यापासून श्री गणेश जन्माचे कीर्तन करण्यात येऊन दुपारी १२.४० वा. गणेश जन्मकाळ करण्यात आला. या वेळी महिलांनी पाळणा गीत व आरती करण्यात आली तसेच बाल गणेशाच्या मूर्तीचे भक्तांना दर्शन देण्यात आले.

नांदगाव ग्रामस्थ मंडळातर्फे भक्तांना या वेळी प्रसादाचे वाटप करण्यात आले. दर्शनार्थ आलेल्या भक्तांना श्री गणेश दर्शन सुलभ व्हावे यासाठी येथील श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहकार्य केले, तर मुरुड पोलीस ठाण्याचे निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

या वेळी मंदिराच्या पटांगणात मोठी यात्रा भरली होती. हार, नारळ, फुले आदी पूजा साहित्यासह पेढे, बर्फी अशा मिठाईबरोबरच खेळणी, भजी, उसाचा रस व संसारोपयोगी साहित्याची दुकाने व स्टॉल उभारण्यात आले होते.

माघी उत्सवानिमित्ताने मंदिरावर विद्युतदीपांची, तर मंदिरात विविध फुलांच्या माळांची रोषणाई करण्यात आली होती.

# रोह्यात माघी गणेशोत्सव साजरा

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा–अष्टमी नामदेव शिंपी समाजाचे १८९६ स्थापना झालेल्या १३० वर्षाच्या पुरातन मंदिरात माघी गणेशोत्सव मोठ्या उत्सहात साजरा करण्यात आला.

सकाळी समाजाचे अध्यक्ष मकरंद बारटके व महिला मंडळ अध्यक्ष संपदा पतंगे यांच्या मार्गदर्शनाखाली कमिटी सभासदांनी व शिंपी समाजाच्या बंधू–भगिनी सकाळी मंदिरात एकत्र जमून श्री गणेशाला अभिषेक, विधीवत पूजा, आरती श्री. किरण व सौ. रेवती बारटके या उभयतांच्या हस्ते करण्यात आली. रवींद्र पतंगे यांनी पौराहित्य केले.

दुपारी वरसे येथील गजानन महाराज महिला भजनी मंडळातील भगिनींचे सुश्राव्य भजन सादर केले. मंदिर रंगीबेरंगी फुलांनी, पताका, रांगोळी आणि विद्युत रोषणाइने सुशोभीत केले होते.

दिवसभर परिसर आनंदी वातावरणाने न्हाऊन निघाले. दुपारी आरती झाल्यावर मिष्ठान्न महाप्रसादाचा गणेशभक्तांनी आस्वाद घेतला.

माजी आमदार अनिकेत तटकरे, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, नवनिर्वाचित नगराध्यक्ष वनश्री शेडगे आणि उपस्थित नगरसेवक, नगरसेविकांचा शिंपी समाजातर्फे शाल, श्रीफळ प्रदान करून यथोचित सत्कार करण्यात आला.





# गुजरातचा यूपीवर एकतर्फी विजय



**वडोदरा : वृत्तसंस्था**

महिला प्रीमियर लीग स्पर्धेतील १४वा सामना गुजरात जायंट्स आणि यूपी वॉरियर्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात गुजरातने पहिल्या डावात फलंदाजी करताना आठ गडी बाद १५३ धावा केल्या होत्या. गुजरातकडून अनुभवी फलंदाज सोफी डिवाईनने नाबाद ५० धावांची खेळी केली. या धावांचा पाठलाग करताना यूपीचा संपूर्ण डाव अवघ्या १०८ धावांवर आटोपला.

या सामन्यात यूपी वॉरियर्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या गुजरात जायंट्सकडून सलामीला आलेल्या बेथ मुनीने ३४ चेंडूत ३८ धावांची खेळी केली, तर डॅनियल वॅटने आठ चेंडूत अवघ्या १४ धावा केल्या. तर अनुष्का शर्मानेदेखील आठ चेंडूत १४ धावा केल्या. कर्णधार शले गार्डनर या डावात स्वस्तात माघारी परतली. तिने अवघ्या पाच धावा केल्या. गुजरात जायंट्सचा डाव अडचणीत असताना सोफी डिवाईनने डाव सांभाळला. तिने ४२ चेंडूत दोन चौकार आणि तीन षटकारांचा साहाय्याने नाबाद ५० धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर गुजरात जायंट्सने आठ गडी बाद १५३ धावांपर्यंत मजल मारली.

हा सामना जिंकण्यासाठी यूपी वॉरियर्सला १५४ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना किरण नवगिरे शून्यावर माघारी परतली. त्यानंतर मेग लेनिंगदेखील अवघ्या १४ धावांवर बाद झाली. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या फिबी लिचफिल्डने २७ चेंडूत ३२ धावांची खेळी केली, पण तिला इतर कुठल्याही फलंदाजांकडून साथ मिळाली नाही. हरलिन देओल अवघ्या तीन धावांवर बाद झाली. यूपी वॉरियर्सला हा सामना जिंकण्याची संधी होती, पण कुठलीही फलंदाज मैदानावर टिकून राहू शकली नाही. त्यामुळे यूपीचा डाव अवघ्या १०८ धावांवर आटोपला. हा सामना गुजरातने ४५ धावांनी आपल्या नावावर केला.

गुजरात जायंट्सने या स्पर्धेत सहा सामने खेळले आहेत. यापैकी हा तिसरा विजय आहे, तर तीन सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला आहे. यूपी वॉरियर्सनेदेखील या स्पर्धेत सहा सामने खेळले आहेत. यापैकी केवळ दोन सामन्यांमध्ये त्यांना विजय मिळवता आला, तर उर्वरित चार सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला आहे.

# टाटा स्टील मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेत गुकेशचा पहिला विजय

## अर्जुन एरिगेसी पराभूत



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नेदरलँडस्मधील विज्क आन झी येथे सुरू असलेल्या टाटा स्टील मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेत पाचव्या फेरीत भारताच्या विश्वविजेत्या डी. गुकेशने आपला पहिला विजय नोंदवला, तर जागतिक क्रमवारीत अग्रस्थानी असलेल्या अर्जुन एरिगेसीला पराभवाचा धक्का बसला आहे.

गेल्या चार फेऱ्यांपासून बरोबरीवर समाधान मानणाऱ्या डी. गुकेशने पाचव्या फेरीत चेक प्रजासत्ताकच्या थाई दाई वान गुयेन याचा पराभव केला. काळ्या मोहऱ्यांनी खेळताना गुकेशने तांत्रिकदृष्ट्या उत्कृष्ट खेळ केला. त्याने आपल्या हत्तीचा त्याग करून प्रतिस्पर्ध्यावर दबाव आणला आणि ५१ चालींमध्ये विजय मिळवला. या विजयामुळे तो तीन गुणांसह संयुक्तपणे चौथ्या क्रमांकावर पोहचला आहे.

या स्पर्धेत आघाडीवर असलेल्या अर्जुन एरिगेसीला स्लोव्हेनियाच्या व्लादिमीर फेडोसेव्हने पराभूत केले. अर्जुनने पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळताना काही जोखीम पत्करली, जी त्याच्या अंगलट आली. मध्यंतरापर्यंत अर्जुनची स्थिती कमकुवत झाली होती, ज्याचा फायदा फेडोसेव्हने घेत विजय मिळवला. या पराभवामुळे अर्जुन २.५ गुणांसह सातव्या स्थानावर घसरला आहे.

इतर लढतीत भारताच्या आर. प्रज्ञानंदने हॉलंडच्या अनिश गिरीविरुद्ध आपली तिसरी बरोबरी साधली. तो सध्या १.५ गुणांवर आहे. अरविंद चिदंबरमला जर्मनीच्या विन्सेंट केमरकडून पराभव स्वीकारावा लागला. अरविंददेखील १.५ गुणांवर आहे.

# दक्षिण आफ्रिकेच्या टी-२० वर्ल्डकप संघात दोन बदल

**केपटाऊन : वृत्तसंस्था**

भारत आणि श्रीलंकेत संयुक्तरित्या टी -२० वर्ल्डकप स्पर्धेचे आयोजन केले जाणार आहे. ही स्पर्धा सुरू व्हायला अवघे काही दिवस शिल्लक असताना दक्षिण आफ्रिकेने आपल्या संघात दोन मोठे बदल केले आहेत. संघातील प्रमुख खेळाडू टोनी डी जॉर्जी आणि डोनोवन फरेरा दुखापतीमुळे संघाबाहेर झाले आहेत. या दोघांच्या रिप्लेसमेंटची घोषणा करण्यात आली आहे.



टोनी डी जॉर्जी आणि डोनोवन फरेरा हे दोघेही दक्षिण आफ्रिका संघातील प्रमुख खेळाडूंपैकी एक आहेत. स्पर्धा तोंडावर असताना दोघेही संघाबाहेर होणे हा दक्षिण आफ्रिकेसाठी मोठा धक्का आहे. या दोघांच्या जागी रायन रिकल्टन आणि ट्रिस्टन स्टब्स या दोघांना संधी देण्यात आली आहे. ते वेस्ट इंडिजविरुद्ध होणाऱ्या टी-२० मालिकेतदेखील खेळताना दिसून येणार आहेत. तर डेव्हिड मिलर पुनरागमन करणार की नाही, हे अजूनही स्पष्ट झालेले नाही.

## न्यूझीलंडचा मिल्ने वर्ल्डकपमधून बाहेर

**ऑकलंड** : आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धा सुरू व्हायला अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. या स्पर्धेतील सामने भारत आणि श्रीलंकेत खेळवले जाणार आहेत. या स्पर्धेला सुरुवात होण्यापूर्वीच न्यूझीलंडला धक्का बसला आहे. न्यूझीलंडचा स्टार वेगवान गोलंदाज एडम मिल्ने दुखापतीमुळे टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतून बाहेर पडला आहे.



मिल्ने सध्या दक्षिण आफ्रिकेत सुरू असलेल्या एसए२० लीग स्पर्धेत सनरायझर्स ईस्टर्न केप्स संघाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी मैदानात उतरला होता. दरम्यान, या स्पर्धेत गोलंदाजी करत असताना तो दुखापतग्रस्त झाला आहे. त्यामुळे त्याला संघाबाहेर व्हावे लागले आहे. मिल्नेच्या जागी बदली खेळाडू म्हणून काईल जेमिसनला संधी देण्यात आली आहे.

# रणजी ट्रॉफीत सर्फराज खानचे द्विशतक

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

सर्फराज खानने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी आणि विजय हजारे ट्रॉफीत धावांचा पाऊस पाडून निवडकर्त्यांचे लक्ष वेधून घेतले होते. आता रणजी ट्रॉफीतही त्याने दमदार द्विशतक झळकावले आहे.

रणजी ट्रॉफी स्पर्धेतील दुसऱ्या टप्प्यातील सामन्यांना सुरुवात झाली आहे. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियममध्ये मुंबई विरूद्ध हैदराबाद सामना सुरू आहे. या सामन्यातील पहिल्या डावात मुंबईने ५०० धावांचा पल्ला गाठला. यादरम्यान सर्फराज खानने २१९ चेंडूंचा सामना करत १०३च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करताना २२७ धावांची खेळी केली आहे. त्याने २०६ चेंडूत आपले द्विशतक पूर्ण केले. यादरम्यान त्याने १९ चौकार आणि नऊ षटकार खेचले. त्याला साथ देत सिद्धेश लाडने १०४ धावांची खेळी केली.



भारतीय संघातून बाहेर असलेल्या सर्फराजने देशांतर्गत क्रिकेटमध्ये मिळेल त्या संधीचा फायदा घेत तिन्ही फॉरमॅटमध्ये शतके झळकावली आहेत. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत आसामविरूद्ध फलंदाजी करताना त्याने ४७ चेंडूंचा सामना करत १०० धावांची दमदार शतकी खेळी केली होती. त्यानंतर विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत गोवाविरुद्ध फलंदाजी करताना त्याने ७५ चेंडूत १५७ धावा चोपल्या होत्या. आता रणजी ट्रॉफीतही त्याच्या फलंदाजीचा बोलबाला पहायला मिळाला आहे.

या सामन्यात हैदराबादने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या मुंबईकडून सिद्धेश लाडने १०४ धावांची खेळी केली, तर सर्फराज खानने २२७ धावा केल्या. याशिवाय आकाश पारकरने ७५ धावांची खेळी केली. मुंबईने आठ गडी बाद ५३३ धावा केल्या आहेत.

### प्रथम श्रेणीमध्ये पाच हजार धावा

सर्फराज खानसाठी हे द्विशतक खास ठरले आहे, कारण या द्विशतकासह त्याने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पाच हजार धावा पूर्ण केल्या आहेत. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये फलंदाजी करताना त्याने ६४.३च्या सरासरीने धावा केल्या आहेत. मुख्य बाब म्हणजे २१व्या शतकात पदार्पण करणाऱ्या कुठल्याही फलंदाजाने या सरासरीने फलंदाजी करून पाच हजार धावांचा पल्ला गाठला नव्हता.

# ...तर बांगलादेश क्रिकेटचे होणार आर्थिक नुकसान




**ढाका : वृत्तसंस्था**

आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेचे आयोजन भारत आणि श्रीलंकेत केले जाणार आहे, पण बांगलादेशने या स्पर्धेवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. बांगलादेश क्रिकेट बोर्डला अजूनही असे वाटतंय की, आयसीसीचा निर्णय आपल्या बाजूने लागू शकतो, मात्र जर बांगलादेशचा संघ आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धे तून बाहेर पडला, तर बांगलादेश क्रिकेटचे मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते.

पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार बांगलादेश क्रिकेट बोर्डने या स्पर्धेतून माघार घेण्याचा निर्णय घेतला, तर येणाऱ्या काही दिवसात बोर्डला २४० कोटींचा फटका बसू शकतो. ही रक्कम आयसीसीकडून बांगलादेश क्रिकेट बोर्डला वर्षाला दिल्या जाणाऱ्या मानधनाचा भाग आहे. त्यांनी स्पर्धा खेळण्यास नकार दिल्यास ही रक्कम त्यांना दिली जाणार नाही. त्यामुळे बांगलादेश क्रिकेट बोर्ड स्पर्धा खेळण्यासाठी भारतात येणार की आर्थिक फटका सहन करणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

गेल्या काही दिवसांपासून बांगलादेशमध्ये हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराचा मुद्दा सध्या चर्चेत आहे. आधी बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिजूर रहमानवर आयपीएल खेळण्यावर बंदी घालण्याची मागणी केली होती. बीसीसीआयने ही मागणी मान्य करून त्याला स्पर्धेबाहेर केले आहे. त्यानंतर बांगलादेश क्रिकेट बोर्डने सुरक्षेचे कारण देत टी-२० वर्ल्डकप खेळण्यासाठी भारतात येण्यास नकार दिला.

आयसीसीने बांगलादेश क्रिकेट बोर्डला निर्णय घेण्यासाठी २२ जानेवारीपर्यंत अल्टीमेटम दिला होता. बांगलादेश बोर्डने भारतात न जाण्याचा निर्णय घेतला आहे. जर बांगलादेशचा संघ स्पर्धेतून बाहेर पडला, तर आयसीसी रँकिंगच्या आधारे स्कॉटलंडला ही स्पर्धा खेळण्याची संधी मिळू शकते. याबाबत आयसीसीकडून अपडेट समोर आलेली नाही.

बांगलादेशने स्पर्धेतून माघार घेतली, तर त्यांचे २४० कोटींचे नुकसान होणार हे तर निश्चित आहे. याचा फायदा स्कॉटलंडला होऊ शकतो.

# बीसीसीआयकडून रोहित-विराटचे पॅकेज घटणार?

## वार्षिक करारात बुमराहलाही फटका बसण्याची शक्यता

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) खेळाडूंच्या वार्षिक करारासंदर्भात नवी प्रणाली लागू करण्याच्या तयारीत आहे. या नव्या मॉडेलनुसार ग्रेड ए+ कॅटेगरी रद्द केली जाण्याची शक्यता आहे. सूत्रांच्या माहितीनुसार बोर्डाने हा प्रस्ताव मंजूर केल्यास टीम इंडियाचे दिग्गज विराट कोहली आणि रोहित शर्मा यांचे डिमोशन होऊ शकते. फक्त वनडे खेळत असल्यामुळे या दोघांना आगामी वार्षिक करारात ग्रेड-बी मध्ये समाविष्ट केले जाऊ शकते.

अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने भारतीय क्रिकेटर्सच्या वार्षिक करार प्रणातील मोठे बदल सुचवले आहेत. समितीने ए+ कॅटेगरी (सात कोटी रुपये) रद्द करून फक्त तीन कॅटेगरी ए, बी आणि सी ठेवण्याची शिफारस केली आहे. या नव्या प्रस्तावावर बीसीसीआयच्या एपेक्स कौन्सिल बैठकीत अंतिम निर्णय अपेक्षित आहे.




वृत्तानुसार नवी प्रणाली लागू झाल्यास सध्या ग्रेड ए+मध्ये असलेले विराट कोहली आणि रोहित शर्मा यांना ग्रेड बी मध्ये स्थान दिले जाऊ शकते. या दोन्ही दिग्गजांनी टी-२०पाठोपाठ कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यामुळे वार्षिक कराराच्या वेळी त्यांचा पगारही कमी होणार हे जवळपास निश्चित मानले जात होते, पण आता नव्या प्रणालीमुळे जसप्रीत बुमराहलाही पगार कपातीचा फटका बसेल.

### असा असतो करार

बीसीसीआयच्या नियमानुसार एका हंगामात तीन कसोटी किंवा आठ वनडे किंवा १० टी-२० सामने खेळलेल्या खेळाडूंना वार्षिक करारबद्ध खेळाडूंच्या यादीत स्थान मिळते. याआधी बीसीसीआयने हर्षित राणाला सवलत देत भारतासाठी दोन कसोटी, पाच वनडे आणि एक टी-२० सामने खेळल्यानंतर करारबद्ध खेळाडूंच्या यादी स्थान दिले होते.








### गणेश दर्शन

**पनवेल : माघी गणेशोत्सवानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी पनवेल परिसरातील विविध ठिकाणी विराजमान झालेल्या गणरायांचे दर्शन घेतले आणि भाविकांशी संवाद साधत सर्वांना माघी गणेश जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी त्यांच्या समवेत भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस व नगरसेवक नितीन पाटील, पनवेल शहराध्यक्ष व नगरसेवक सुमित झुंझारराव, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष व आदई पंचायत समिती गणाचे उमेदवार भूपेंद्र पाटील, पळस्पे पंचायत समितीचे उमेदवार राजेंद्र पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि भाविक उपस्थित होते.**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com